म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५९१



# बोरकरांची प्रेमकविता

REFBK-0024450
REFBK-0024450

म. ग्रं. सं. ठाणें
विषय वाङ्मय
सं. क्र. २५७१९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२५९९
२८८५०
२०/१२/०८

# बोरकरांची प्रेमकविता

# बोरकरांची प्रेमकविता

कविवर बा. भ. बोरकर यांनी १९२९ ते १९८४ या पंचावन्न वर्षांत रचलेल्या कवितांतून निवडलेल्या १११ प्रेमकवितांचा संग्रह

संपादक / **रामचंद्र चिंतामण ढेरे**

REFBK-0024450

REFBK-0024450

सुरेश एजन्सी, पुणे

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© श्रीमती रुक्मिणीबाई बोरकर
पर्वरी आल्त, बार्देश–गोवा

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

प्रथमावृत्ती
३० नोव्हेंबर १९८४

किंमत चाळीस रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती, टिळक रोड
पुणे ४११०३०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. २.४.४.५०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

ये, हे सखि, मातीचे आश्वासन घेउनि ये
प्रीतीवर विश्वासुन उन्मनमन होउनि ये
ये दिठीत, ये मिठीत, भेट पेट घेत जरा
शत ज्योतींमधुनि करू मातीचा हेत पुरा

## प्रेमकवितांच्या निवडीविषयी

‘जीवनसंगीत’ (१९३८) पासून ‘चिन्मयी’ (१९८४) पर्यंत प्रकाशित झालेल्या, बोरकरांच्या नऊ संग्रहांतून निवडलेल्या १११ प्रेमकवितांचा हा संग्रह आहे.

त्यांचा क्रम रचनाकालानुसार राखलेला आहे. १९२९ ते १९८४ या पंचावन्न वर्षांत रचलेल्या या कविता आहेत.

या संकलनाचा संकल्प बोरकरांचाच होता आणि ‘बोरकरांची प्रेमकविता’ हे त्याचे, साक्षात् विषयद्योतक असे शीर्षकही त्यांनीच निश्चित केले होते.

या संकल्पाच्या पूर्तीसाठी त्यांनी आपल्या परिवारातील काही रसिकांना त्यांच्या आवडीच्या प्रेमकवितांची निवड कळवायला सांगितले होते.

अशा रसिकांपैकी प्रा. पुरुषोत्तम पाटील (धुळे) यांनी सुमारे साठ कवितांची निवड बोरकरांकडे कळवली होती आणि माझी मुलगी चि० अरुणा हिनेही तिच्या आवडीच्या प्रेमकवितांची निवड करून ठेवली होती.

स्वतः बोरकरांनी एका वहीत ‘बोरकरांची प्रेमकविता’ या शीर्षकाखाली ‘बोरकरांची कविता’ (१९६०) या या बृहत् संकलनातून क्रमाने आपल्या प्रेमकवितांची निवड नोंदवायला सुरुवात केली होती; परंतु फक्त २३ च कवितांची नावे या अपूर्ण नोंदीत आलेली आहेत. या अपूर्ण नोंदीतील कविता बोरकरांच्या काव्यरचनेच्या प्रारंभकाळातील (१९२९–१९३७) आहेत.

या संग्रहाबरोबरच बोरकरांच्या अखेरच्या अप्रकाशित कवितांचा संग्रह, त्यांनीच योजिलेल्या ‘चिन्मयी’ या नावाने प्रकाशित होत आहे; त्यातील ९ प्रेमकवितांची निवड बोरकरांचे निकटवर्ती रसिक-स्नेही प्राचार्य वसंतराव देसाई यांनी केलेली आहे.

या ९ पैकी ७ कवितांना (क्र. १०४–१०७ व १०९–१११) शीर्षके नव्हती, ती प्रा. देसाई यांनीच दिलेली

आहेत. क्र. ८९ ही कविता म्हणजे 'कांचनसंध्या'-मधील 'काही अभंग' (पृ. १२९-१३६) या शीर्षकाने संग्रहित झालेल्या अभंगांतील तिसरा अभंग आहे. त्याचे 'चेटूक' हे शीर्षक मी दिलेले आहे.

बोरकर, प्रा. पाटील आणि अरुणा यांची निवड काही प्रमाणात परस्परव्यापी असणे अटळच होते; परंतु प्रकाशकांनी निवडीला भरपूर वाव दिल्यामुळे, मी या संग्रहात समाविष्ट केलेल्या एकूण १११ कवितांत बोरकर आणि त्यांच्या कवितांचे तीनही रसिक चाहते यांच्या निवडीचा पूर्ण समावेश करू शकलो आहे.

प्रेमकवितांच्या निवडीत महत्त्वाचा वाटा उचलणाऱ्या या तीन रसिकांबरोबरच, श्री. अप्पासाहेब वज्रम आणि सौ. पद्माताई वज्रम (बोरकरांचे जामात आणि कन्या) यांनी संपादक-प्रकाशकांना सर्वतोपरी सहकार्य केले आहे. प्रा. देसाई यांनी तर हे काम आपलेच मानले आहे. या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

प्रकाशक श्री. बाळासाहेब कारले, चित्रकार श्री. सुभाष अवचट आणि मुद्रक श्री. अण्णासाहेब लाटकर यांनी त्यांच्या प्रतिष्ठेला साजेसे देखणेपण या पुस्तकाला प्राप्त करून दिले आहे.

गेले आठ-दहा महिने माझी प्रकृती लेखन-वाचन-चिंतनाला अनुकूल राहिलेली नसताना आणि गेल्या जुलैत बोरकरांचे निर्याण घडल्यामुळे त्यांच्याशी या संदर्भात संवाद करण्याची संधी कायमची दुरावली असताना मला हे संपादनाचे काम प्रकाशकांच्या इच्छेनुसार अत्यल्प काळात पूर्ण करावे लागले. या उभयविध प्रतिकूलतेमुळे बोरकराना आणि त्यांच्या कवितांच्या जाणकार चाहत्यांना अपेक्षित असलेल्या पातळीवरचे समाधान वाचकांना पूर्णांशाने लाभणार नाही, याची मला सखेद जाणीव आहे.

३० नोव्हेंबर १९८४ — संपादक

# अनुक्रम


माती आणि ज्योती ( प्रस्तावना ) / तेरा

१ माझी आगबोट / १

२ प्रणयमुग्धेस / २

३ परिचये प्रेम तव जाइल का ? / ३

४ तीन सांजा / ५

५ सायुज्यमुक्ती / ७

६ आणि मज माउलीच जाहली / ९

७ विरोधी भक्ती / १०

८ कशि तुज समजावु सांग ? / १२

९ येइ सखी / १३

१० गोड कळ / १४

११ तुझी माझी प्रीत / १५

१२ मुशाफिरा ! / १६

१३ गेले भिउनि मनात ! / १८

१४ संधिकाल / १९

१५ हिरकणी / २०

१६ —स / २२

१७ उरले घरटे दूर ! / २३

१८ क्षणभंगुर जरि जीवन / २४

१९ निरोप / २५

२० आपण दोघे लहरी ग / २६

२१ सावल्यांचे नृत्य / २७

२२ राजा–राणी / २८

२३ ये पुढल्या दाराने / २९

२४ उर्वशीच तू जाया / ३०

२५ पाठमोरी पौर्णिमा / ३१

२६ माझी बेगम / ३३

२७ स्मृती / ३४
२८ रमणी आणि धरणी / ३६
२९ हरिच्या स्मरभुवनी / ३८
३० जपानी रमलाची रात्र / ४०
३१ स्पर्श / ४२
३२ सोळा वर्षांनंतर / ४३
३३ खंजीर हे मारीत जा ! / ४४
३४ माझ्यापरी / ४५
३५ डोळे तुझे बदामी / ४६
३६ तव नयनाचे दल हलले ग / ४७
३७ खाईतला स्वर्ग / ४८
३८ रुमडाला सुम आले ग / ४९
३९ खिडक्यांवर वाजे वारा / ५१
४० आज तुझ्या घरि आले / ५३
४१ मी नंदाघरची वावडि ग / ५४
४२ पागल हो क्षण / ५६
४३ पावले धारेच्याही पुढे / ५७
४४ श्यामा / ५९
४५ डाळिंबीची डहाळीशी / ६१
४६ अजब आगळी / ६२
४७ मृदुमदगति ती येते जेव्हा / ६३
४८ कामद्रुमाची डहाळी / ६६
४९ हीच हीच ती सागरवेला / ६७
५० अपरिचिते / ७०
५१ विरले सगळे सूर / ७१
५२ मंद असावे जरा चांदणे / ७२
५३ असा कसा मी तरुण निरंतर / ७३
५४ घनसगर्भ नजर एक / ७४
५५ मंदावता सगळी उन्हे / ७५

५६ सरिंवर सरी आल्या ग / ७६
५७ तुला पहावे / ७८
५८ तुझ्यामुळे / ८०
५९ आज पहाटे / ८१
६० जवळ जवळ असुन रोज / ८३
६१ ती एक याद / ८४
६२ तू रहा अशीच दूर / ८५
६३ मातीमधि मुरल्याविण / ८६
६४ इंद्रदिनांचा असर सरेना / ८७
६५ प्रीतीची वाट / ८९
६६ का वळून पाहिलेस / ९२
६७ वारंवार आवर्जून मन म्हणते / ९३
६८ राग नाही रोष नाही / ९४
६९ सूर सूर / ९५
७० उत्तर / ९६
७१ कृतार्थ / ९७
७२ घनवदन / १००
७३ अनलशिखे श्रीमंत / १०१
७४ दंश / १०२
७५ भरलेले दोन घडे / १०३
७६ छेडु नको पण भलत्या वेळी / १०४
७७ संग / १०६
७८ आम्ही देखिली अतुल देखणी / १०८
७९ घरचिये बांये जोइली बिंदुली / १०९
८० मज सजवी बाइये / ११०
८१ माझ्या कानी बाई वाजे अलगुज / १११
८२ आतला आतला सये / ११२
८३ विरहुली / ११३
८४ कोंभ / ११४

८५ वीस वर्षांनंतर / ११५
८६ केशी तुझिया फुले / ११६
८७ नक्षत्रांनी बांधुनि कुंतल / ११७
८८ संसार तुझा फुलताना / ११८
८९ चेटूक / ११९
९० तुझ्या रानात रे / १२०
९१ दिसली नसतीस तर / १२१
९२ चालीमधली वीज कुठे ती ? / १२३
९३ धुळीतले फूल / १२४
९४ ऋतु हिरवा / १२५
९५ काजवे / १२६
९६ ये / १२७
९७ नाते / १२८
९८ मी चुकले त्याच्या गावा / १२९
९९ तू शहाणी / १३०
१०० गीत माझे गायलो मी / १३१
१०१ सावधान / १३२
१०२ समुद्र बिलोरी ऐना / १३३
१०३ उर्वशी / १३४
१०४ दिवा असाच राहु दे / १३५
१०५ नका रागेजू साजणी / १३६
१०६ विस्मरेन जीवनात / १३७
१०७ का मला तुझीच ओढ / १३८
१०८ तुझे मन / १३९
१०९ कशी आलीस घेऊन / १४०
११० नको आणूस आरशी / १४१
१११ डाळिंबीची दोन फुले / १४२
प्रेमकवितांच्या निवडीचा तपशील / १४३
बोरकरांची प्रकाशित मराठी काव्यसंपदा / १४४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. .....
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# माती आणि ज्योती

'बोरकरांची प्रेमकविता' या शीर्षकाने बोरकरांच्या निवडक कवितांचे एक संपादन व्हावे, ही कल्पना बोरकर आणि त्यांचे एक प्रकाशक श्री. बाळासाहेब कारले यांच्या वारंवार होणाऱ्या भेटीगाठींमधून कधीतरी एकदा जन्मली आणि ती उभयपक्षी आनंदाने स्वीकारली गेली. ह्या प्रेमकवितांची निवड स्वतः बोरकरांनी आपल्या एकदोन रसिक स्नेह्यांची मदत घेऊन करायची, मीही अशी निवड करायची, दोघांनी मिळून ती पक्की करायची आणि प्रस्तावना मी लिहायची, अशी बोरकरांचीच कल्पना.

बोरकर माझ्यापेक्षा वयाने मोठे. ते प्रसिद्धीच्या ऐन भरातले लोकप्रिय कवी असतानाच्या आसपास जेव्हा माझा-त्यांचा प्रथम स्नेह जुळला, तेव्हा मी 'साधना' साप्ताहिकात काम करणारा पंचविशीतला एक सामान्य तरुण होतो पण आमचा स्नेह जुळायला या प्रकारच्या कुठल्याच अंतराचा अडथळा आला नाही. दिवसाचे कामधाम आटोपून मी मोकळा झालो की रात्री कधी पुणे-मुंबई रस्त्यावर, तर कधी संगमाच्या बाजूला आम्ही फिरायला जात असू. बोरकर त्यांच्या जुन्या-नव्या कविता मनसोक्त गात असत आणि माझे श्रवणाचे भान मंत्रून जात असे. हा थोर कवी आणि त्याची कविता यांना त्या काळात मी अगदी मोकळ्या मनाने जवळून अनुभवले. कवितेवरच्या रंगलेल्या चर्चांनी आणि त्यानंतर रंगलेल्या कवितांच्या प्रहरांनी माझ्या मनात कायमचे घर केले.

संशोधनाच्या गहन गिरिगव्हरात फिरतानाही संतकवींच्या वाणीइतकीच बोरकरांची कविता मला नेहमी प्रिय राहिली. बोरकर गोव्याला गेल्यानंतर आमच्या भेटी थांबल्या. वैयक्तिक स्नेहाची देवघेव तशी सातत्याने राहिली नाही. पुण्याला ते आले तरी आवर्जून भेटणे दरवेळी व्हायचेच असे नाही. पण एकमेकांना कवितेतून पटलेली जुनी ओळख फार जिव्हाळ असली पाहिजे 'यौवनाचे झाड' या त्यांच्या कवितेवर प्रसिद्ध झालेला माझा एक लेख या कवि-रसिक नात्याला नव्याने झळाळी देऊन गेला. या संग्रहाला प्रस्तावना लिहायची ती मी, असे बोरकरांना वाटले असेल, ते ह्या फार वर्षांपासून स्वतंत्रपणे दोघांनी जपलेल्या आणि त्यांना भावलेल्या नात्याच्या अर्थामुळे. एरवी

आधुनिक कवितेच्या समीक्षेशी माझा प्रकट संबंध कधी आलेलाच नाही.

मी अर्थातच या प्रिय सूचनेचा सानंद स्वीकार केला. मला या निमित्ताने बोरकरांशी जे बोलायचे होते, त्यांना जे विचारायचे होते, ते मात्र राहूनच गेले. 'बोरकरांची प्रेम-कविता' या तऱ्हेचे संपादन करणे मोठे कठीण काम होते. एक तर प्रेमकवितांची निवड करणेही मुळीच सोपे नाही. त्यांच्या कवितांमधून निसर्ग, अध्यात्म आणि प्रेम यांच्या रसायनाचाच प्रत्यय जागजागी येत असताना केवळ प्रेमकविता म्हणून त्यांची चाळणी करणे अवघड आहे. ह्या गोष्टीची कल्पना स्वतः बोरकरांना होती का? अशा तऱ्हेच्या निवडीमागे आणि मूळ पुस्तकाच्या कल्पनेमागेही त्यांची नेमकी कोणती दृष्टी होती? मला त्यांना हे विचारता आले नाही. अगदी अनपेक्षितपणे त्यांचे आजारपण वाढले आणि त्यात त्यांचे निधन झाले. आमच्या दोघांच्या बैठकी राहूनच गेल्या. या कवितांची साहित्यशास्त्रीय समीक्षा करताना नव्हे, तर एक रसिक म्हणून या कवितांचा पुनः पुन्हा आस्वाद घेताना मनात येणाऱ्या विचारांची ही शाब्दिक रेखाटने त्यांना बोलून दाखवायचीही राहिली.

स्वतः बोरकरांनी या संपादनासाठी त्यांना आवडणाऱ्या कविता निवडायला प्रारंभ केला होता. प्रा. पुरुषोत्तम पाटील आणि माझी मुलगी चि. अरुणा यांनाही ते बोलले होते. प्रा. पाटील यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कवितांची निवड कळवली होती. बोरकरांच्या निधनानंतर, या कवितांची निवड करताना स्वतः बोरकर, प्रा. पाटील व चि. अरुणा या तिघांच्याही निवडीचा मी माझ्या व्यापक निवडीत समावेश केला आहे.

१९३० साली बोरकरांचा 'प्रतिभा' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर गेली चौपन्न वर्षे बोरकरांनी उदंड कविता लिहिली. मृत्यूनंतर प्रकाशित झालेल्या 'चिन्मयी' सकट त्यांचे एकूण दहा मराठी काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. शिवाय मेघदूताचे भाषांतर–काव्यान्तर म्हणू या– प्रसिद्ध झाले. 'महात्मायना'चे प्रारंभपर्व लिहून झाले. अन् एक हिन्दी कवितांची लहानशी पुस्तिका प्रसिद्ध होत आहे. कोकणी काव्याचा नि गद्य लेखनाचा विचार बाजूला ठेवला, तरी सुद्धा ही काव्यनिर्मिती प्रचंड झाली आहे.

निर्मितीचा हा सातत्याने आणि वैपुल्याने चाललेला ओघ काही गोष्टी सुचवतो : एक तर बोरकरांजवळ निर्माणशक्तींचा मोठा साठा होता. इंग्रजी सातवीत असताना कवितेचा साक्षात्कार त्यांना कसा झाला, याची मोठी सुंदर गोष्ट बोरकरांनी पाडगावकरांशी बोलताना सांगितली आहे. (ती प्रेमकवितांच्या संदर्भात पुष्कळ काही सुचवून जाते.) त्या साक्षात्कारी क्षणापासून मृत्यू दिसू लागेपर्यंत हा ओघ खंडित तर झाला नाहीच, पण मंदावलाही नाही. वेगवेगळ्या भाषांमधूनही स्वतःला व्यक्त करण्याची उत्कट ऊर्मी त्यांना होती. यामागे निर्माणशक्तींचा एक अम्लान आणि चिरंजीवी साठा होता, यात शंका नाही.

जिथे यौवनावाचून दुसरे वय नाही, अशा यक्षलोकाचे स्वप्न महाकवी कालिदासाने पाहिले होते. खरे तर कालिदासासारख्या चिरतरुण कवींच्या लेखी सारे जीवनच यक्षलोकासारखे असते. क्षराच्या पारदर्शी पात्रातून अक्षराची सुरा प्राशन करून धुंद होणाऱ्यांना अजरतेचे अन् अमरतेचे वरदान निरंतर लाभलेले असते. कविवर बोरकर हे मला असेच यक्षलोकीचे निवासी वाटतात. जायेला ' उर्वशी 'च्या प्रतिमेत पाहणारे. ' असा कसा मी तरुण निरंतर ? ' हा प्रश्न आश्चर्याने विचारणारे. इहलोकीचे अभिमानी. चिरयौवनाच्या विजयगाथेचे धुंद गायक. इथल्या सौंदर्याने तृप्त होणारे. अतृप्तीतही उत्कंठेचा आनंद अनुभवणारे. विरहाला ' गाण्या 'ची गंगोत्री मानणारे. काळनदीच्या ऐलथडीचे जीवन सर्व कळांनी भोगताना ते कधी विटले नाहीत–त्यांची अदम्य जीवनलालसा कशानेही मिटली नाही. ऐंद्रिय संवेदनांतील मादक अन् वेधक तरलतेचा त्यांनी तिरस्कार केला नाही. साऱ्या स्थिरचर जीवनातील रूप-रसांचा नि गंध-नादांचा त्यांनी उत्कटतेने सत्कार केला आहे. रसरसणाऱ्या चैतन्याच्या अमृतस्पर्शाने उसळणारा उल्हास त्यांनी रोमरोमी अनुभवला आहे. यौवनाने अंतर्बाह्य भारलेल्या जीवनाचा प्रत्यय त्यांच्या प्रेमकवितेत सहस्रदल-कमलाप्रमाणे सर्वांगी फुललेला आहे. ' कानशिलांच्या तारा झणाणून टाकणाऱ्या ' धुंद वासनेचे विश्वसंगीत अनुभवताना– गाताना बोरकरांची वाणी ' स्तनाकार पेल्या 'तल्या सुरेसारखी फेसाळत राहिली. ' भोगिले ऐश्वर्य सारे स्पर्श-संगीततले ' अशा ऐंद्रिय तृप्तीचे भाव त्यांच्या कवितेत मोगऱ्याच्या कळ्यांप्रमाणे दरवळत राहिले.

बोरकरांनी भरपूर लिहिले. त्यात डावे–उजवे असे सर्वच आतून बाहेर प्रकट झाले. बोरकरांचे मोठेपण प्राथमिक बाबतीतही जाणवते ते हे की, त्यांत डाव्याचे प्रमाण नेहमीच फार कमी राहिले. यामध्ये अर्थात् त्यांच्या जाणीवपूर्वकतेचा भाग फार थोडा आहे. त्यांच्या निर्माणक स्वभावामुळे, प्रातिभ धर्माने त्यांना त्यांच्या वाटेपासून फार ढळू दिले नाही, हे खरे.

बोरकरांच्या या प्रातिभ धर्माची घडण कशी झाली हे पाहिले की, त्यांच्या कवितांचे आणि पर्यायाने प्रेमकवितांचे स्वरूप, सामर्थ्य आणि शबलता ह्यांचा उलगडा सहज होऊ लागतो. तांब्यांच्या घराण्याची गायकी चालवण्याच्या श्रद्धेने बोरकरांनी कवितेचा श्रीगणेशा गिरवला. तांब्यांचे बोरकरांवरील संस्कार हे केवळ एखादा कवी, साहित्यिक एखाद्या नवोदिताला उमलत्या वयात आवडावा आणि त्याच्या वाटेने चालण्याची ऊर्मी त्याला लाभावी, अशा प्रकारचे नव्हते. बोरकरांच्या प्रतिभेची जात ज्या प्रकारची होती, त्या प्रकारची जात असणारे तांबे होते. बोरकरांच्या मनःपिंडाला ज्या प्रकारच्या चिंतनाची नि संचिताची हाक होती, आवाहन होते, त्या प्रकारचे चिंतन आणि संचित जवळ असणारे तांबे होते. बोरकरांच्या सुदैवाने त्यांना ज्या प्रकारची प्रातिभ दर्शने

हाकारीत होती, त्या प्रकारची दर्शने सुभगसुंदरतेने व्यक्त करणारे तांबे त्यांच्या लगतच्या भूतकाळात आणि त्यांच्या आयुष्याच्या प्रारंभकाळात वावरत होते.

तांबे-वळणाच्या अनेक कविता बोरकरांनी सुरुवातीच्या काळात लिहिल्या; पण त्यातही तांब्यांपेक्षा बोरकरांचे पाऊल सतत पुढे आहे, असे दिसते. नाट्यमयता आणि धृपदातली कल्पना कडव्यांतून खुलवण्याची रीत या दोहोंपेक्षा वेगळी, रसाच्या अंगाने आशयाचा डौल आणि विस्तारही वाढवण्याची बोरकरांची ताकद या कवितांमधूनही जाणवते.

बोरकरांनी तांब्यांचे गुरुत्व मानले आणि त्यांचे रचनातंत्रही आत्मसात् केले, यात कमीपणा कसलाच नव्हता. स्वतः बोरकरांनाही तसे कधी वाटले नाही. कारण त्या दोघांच्या प्रतिभेचे जे नाते एका सनातन आकर्षणाने स्फुरणाऱ्या चैतन्यकेंद्राशी होते, ते एकाच प्रकारचे होते.

टागोर-अरविंदांची कविताही त्याच प्रकारच्या नात्याने ज्या चैतन्यकेंद्राशी बांधली गेली होती, ते केंद्र म्हणजे आपल्या ‘ आत्मलक्ष्यी ’ संस्कृतीने प्रत्येक युगात पाहिलेल्या सत्-शिव-सुंदराच्या स्वप्नाचे. सर्व पार्थिव पसाऱ्यातून अपार्थिव चैतन्याची आनंदस्फुरणे पहाणे, ओळखणे आणि वेचणे अन् त्यांतून आपले अन् सर्वांचे जीवन आनंदगान करून टाकणे हा इथल्या प्राचीन परंपरेतील विचारसाधनेचा आजपर्यंत वाहत आलेला एक संपन्न प्रवाह आहे. टागोर-अरविंद याच मार्गाने फार उंचावर पोचलेले श्रेष्ठ कवी. तांबे तेवढ्या उंचीचे नसले, तरी याच मार्गावर चालणारे निष्ठावंत पथिक. बोरकर तांब्यांचे ऋण मानून, पण त्यांच्यापेक्षा या वाटेने किती तरी पुढे गेले.

बोरकरांनी तांब्यांची गायकी स्वीकारली, ती या वाटेवर पाऊल टाकण्यासाठी. ‘ प्रतिभा ’, ‘ जीवनसंगीत ’ व ‘ दूधसागर ’ यांमधल्या अनेक प्रेमकविता तांबे घराण्याचेच ऋण सांगतात. ज्या पूर्वसूरींचे पाथेय पाठीवर टाकून बोरकर निघाले, त्यांत अर्थात् एकटे तांबे नव्हते. अलीकडचे टागोर होते. पूर्वीचे ज्ञानेश्वरही होते. ज्ञानेश्वरांचा मोठा प्रभाव बोरकरांवर आहे. आशय आणि अभिव्यक्ती– दोन्ही अंगांनी आहे. शब्दसंपत्ती, रचनातंत्र, आशयाची सम्पन्नता, उपमा-अलंकारांचा गोडवा आणि संगीत या सर्व बाबतींत बोरकरांच्या अनेक कविता ज्ञानेश्वरांचा प्रभाव सांगतात.

बोरकरांनी ज्ञानदेवांचे संस्कार आत्मसात् करणे हेही लक्षणीय आहे. बालपणापासून बोरकरांना संतवाणी परिचित झाली गुणगुणण्याच्या अंगाने ती त्यांना प्रथम भेटली आणि हळूहळू तिच्या अर्थाने त्यांना भारून टाकले. वाणीच्या संगीतपरतेकडून अर्थाकडे झालेल्या या प्रवासात अर्थात् बोरकरांना परखड आणि वास्तवाशी दृढ नाते राखणारा तुकाराम किंवा राजकारण आणि धर्मकारण यांना एकाच बैठकीवर आणणारा दांडगा माणूस रामदास नाही आपलासा झाला. सरळ भावाचा, भाळाभोळा नामदेव नाही आपलासा झाला. बोरकरांना आपलेसे झाले ते ज्ञानदेव! उपमा-

उत्प्रेक्षांची खैरात करणारे, जीवनाचे बिंब असणाऱ्या शेकडो प्रतिमांची भाषा बोलणारे, पण तरीही जीवनापलीकडचे अर्थ त्यांतून जागवू पाहणारे, अरूपाला रूपवान करण्याची प्रतिज्ञा करणारे, रसिकत्वी परतत्त्वस्पर्श भोगू पाहणारे ज्ञानदेव ! बोरकरांच्या प्रतिभेची जात पाहता त्यांना ज्ञानदेव प्रिय झाले, यात नवल नाही.

बोरकरांच्या प्रातिभ-संचितात ज्ञानेश्वरांचा आणि तांब्यांच्या, अध्यात्म आणि सौंदर्य यांविषयीच्या चिंतनाचा जसा प्रधान वाटा आहे, तसा तो परंपरागत मूल्यविचारांचाही आहे. या तीन प्रधान घटकांनी बोरकरांच्या प्रातिभ धर्माला विशेष आकार दिला. निर्मितीतले पूर्वसूरींचे ऋण मानणे आणि ते ऋण मानता मानता स्वतःच्या एका स्वतंत्र ऊर्जेने निर्मितीचा जीव उजळून टाकणे ही बोरकरांची रीत स्वतःचे स्वतंत्र व्यक्तित्व प्राणपणाने जपणाऱ्या आजच्या कलावंत पिढीला कदाचित् खोटी, कदाचित् उपरी किंवा कदाचित् नावडती असेल; पण ही रीतसुद्धा, बोरकरांचा प्रातिभ धर्म परंपरागत मूल्य-विचारांचा आणि ज्ञानदेवांच्या व्यक्तित्वाचा जो प्रभाव सांगतो, त्या प्रभावातूनच आली आहे, असे वाटते

बोरकर आणि ते ज्या कालखंडात कविता लिहीत होते तो काळ डोळ्यांपुढे आणला, तर बोरकरांच्या कवितेचे आपल्या काळाशी असणारे बंध कशा प्रकारचे दिसतात ? असे दिसते की, बोरकरांची जीवनदृष्टी मानवाच्या परिस्थितिसापेक्ष व्यवहारातूनच उठणाऱ्या, पण कालनिरपेक्ष अशा काही मूल्यव्यापारावर आहे. जीवनव्यवहाराचे चित्रण करणे त्यांना प्रिय नाही, तर त्या व्यवहाराला ज्याची ओढ आहे– असावी, अशा मूल्यव्यापाराचे मानवी जीवनसंदर्भात होणारे दर्शन चितारणे त्यांना प्रिय आहे. सनातन जीवनमूल्यांचा वारंवार बडिवार आणि त्याच्या विभ्रम-विलसितांची विपुल दर्शने यांमुळे कदाचित् बोरकरांवर अतिसंकेतबद्ध असल्याचा आक्षेप येईल. तसा उच्चार समी-क्षकांनी केलाही आहे. पण यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न बोरकरांनी केला, तर त्यांची कवित्वशक्तीच पूर्णतः शबल होते, याची उदाहरणे बोरकरांच्या कवितेतच सापडतात. बोरकरांनी अगदी क्वचित् वेळी असा प्रयत्न केला आणि परिस्थितिसापेक्ष विचार-विकारांकडे नजर वळवली. पण तिथे त्या कवितेतले काव्यच हरवले याचा अर्थ बोरकरांचा प्रातिभ धर्मच कालनिरपेक्ष मूल्यव्यापारावर दृष्टी केंद्रित करणारा आहे अन् त्यातून जसा संकेतनिष्ठतेचा किंवा पुनरावर्तनशीलतेचा संभव होतो, तसा माणसाला स्वतःच्या बंदिस्त पिंजऱ्यातून आनंदाच्या मुक्त अवकाशात नेणाऱ्या संस्कृत सामर्थ्या-चाही जन्म होतो. बोरकरी कवितेला हे सामर्थ्य उदंड मिळाले आहे.

बोरकरांच्या या वैशिष्ट्यपूर्ण प्रातिभ धर्माने प्रेम, निसर्ग आणि संगीत यांना एकाच मुशीतून जन्म घेताना पाहिले. कधी निसर्ग प्रेम होतो, तर कधी प्रेम निसर्ग होते. कधी प्रेम संगीत होते, तर कधी संगीत प्रेम होते कधी निसर्ग संगीत होतो, तर कधी संगीत

निसर्ग होते. बहुधा हे तिन्ही एकमेक होऊन फुलत-दरवळत असतात. या तिहींच्या वर्णनविलक्षण रसायनाने मनाला चढणारी भावपर धुंदी हा बोरकरी कवितेच्या आशयाचा मुख्य घटक आहे.

बोरकरांच्या कवितांना मंत्राची उपमा द्यावी, असे मला नेहमी वाटते. पुनरावर्तन-शीलता, नादसामर्थ्याचा वापर, आशयाचा भाग होऊन राहिलेला नाद, अलौकिक काही जागवण्याचा हेतू हे सारे मंत्राचे गुणधर्म या कवितेत आहेत. एक भावपूरित अवकाश निर्माण करण्याचे कार्य त्या करतात. या अवकाशात शब्द आणि नाद यांचे सामर्थ्य जागवलेले असते आणि सनातन जीवनमूल्यांचे दर्शन होण्याच्या शक्यता त्यात सामावलेल्या असतात.

बोरकर वृत्तीने सौंदर्यपूजक आहेत. सत्य आणि शिव त्यांना भावते, तेही ते सुंदर असते तेव्हा. ' महात्मायना 'ची प्रेरणाही सत्य-शिवाचे बोरकरांना उत्कटतेने भावलेले सौंदर्य हीच आहे. परंपरेच्या त्यांना मिळालेल्या वारशाने त्यांना मरण ही पुनर्जन्माची नांदी वाटते आणि वेदना सुखाला सोन्याचे रूप देते. ' सोस रे माझ्या जिवा तू, सोसण्याचा सूर होतो ' हा बोरकरी कवितेचा बाणा आहे. त्यामुळे तिला जीवनाची शोकांतिका मंजूर नाही. त्यांच्या लेखी शोकाचा श्लोक होतो आणि तसा तो होताना मानवी जीवन त्याला संवादी करणे यातच माणसाची कृतार्थता असते.

बोरकरांच्या प्रातिभ धर्माने प्रेम हे जीवनाचे एक सर्वव्यापी आणि शक्तिमान असे अंग मानले. प्रेमातून पार्थिव सुंदर होत जाताना त्यांनी पाहिलेच, पण अपार्थिवाला स्पर्श करण्याचीही तीच सुंदर वाट आहे, असेही त्यांनी मानले.

बोरकरांना कविता आणि प्रेम यांचा साक्षात्कार एकाच क्षणी मोठ्या अद्‌भुत रीतीने झाला आणि त्या क्षणाचे नाते चांदण्या रात्रीशी जुळून गेले. मी मागे म्हटले, तसा त्यांच्या लेखी प्रेम, संगीत आणि निसर्ग यांचा जन्म एकाच मुशीतून झाला आणि त्यांचा प्राणही एक राहिला.

बोरकरांच्या निर्माणकतेच्या ( क्रिएटिव्हिटीच्या ) संदर्भात मला सारखे वाटत आले आहे की, या निर्माणकतेच्या मुळाशी त्यांच्या नेणिवेतच नाद, स्त्री आणि निसर्ग यांचा एखादा एकजीव बंध प्रखरपणे कार्यरत असला पाहिजे. माणसाच्या आदिम मनात निर्माणशक्तीचीच तर ही पर्यायी रूपे होती. त्याला एक सर्जन-साक्षात्कार घडला तो सृष्टीतून–जिच्या सर्जनचक्रातून विश्वाचे सातत्य राहते. दुसरा नादातून–ज्यातून संगीत आणि शब्दब्रह्म–नव्हे सारे विश्वच अवतरते. आणि तिसरा स्त्रीतून–जी त्याच्या आयुष्याच्या अंगाने त्याला सर्जनाचा वर देते. म्हणून या तिहींबद्दल एक प्रकारचे गूढ, दैवी आणि तरी पूर्णतः सेंद्रिय असे आकर्षण बोरकरांच्या अबोध मनात असणे अस्वाभाविक नाही. या आकर्षणानेच त्यांच्या निर्माणकतेला सतत

चेतवले आणि त्यांच्या निर्मितीत निसर्ग, संगीत आणि स्त्री यांच्या एकमेकात मिसळणाऱ्या, गूढ दैवी आकर्षण असणाऱ्या अन् तरीही अत्यंत सेंद्रिय अशा प्रतिमांचा अवतार झाला.

'डाळिंबाच्या डहाळीशी नको सांजवेळी फुलू' यासारख्या किंवा 'जांभा रंगा आला दारी जरा विलगून हास' यासारख्या किंवा 'लोचनी ये आज पाणी त्वत्स्मृतीने साजणी । भैरवी आलापिते ही रात्र येथे चांदणी' यासारख्या कविता वाचताना त्यांतल्या एकजीव प्रतिमांमागची निर्मायकता मला अशी उलगडावीशी वाटते

त्यामुळे त्यांचा निसर्ग प्रेयसीचे सारे भावलावण्य स्वतःमध्ये सामावून घेत असतो अन् त्यांची प्रेयसी निसर्गाचे रूपलावण्य स्वतःमध्ये मिरवीत असते.

मावले नाही कवेत ते हे
हवेत फाकले होऊन गंध
तापला होता हाडांत तो हा
झाडाझाडातून कापतो छंद

असा हा साक्षात्कार असतो. गोविंदाग्रजांनी लिहिली ती एक प्रकारे 'शाहिरी' धुंदीची प्रेमकविता लिहिली. बोरकरांना चढलेली प्रेमाची धुंदी ही शाहिराची नव्हे. ती भोगांचा स्वामी असलेल्या योग्याची धुंदी होती. या तऱ्हेची रतीच्या रसरसलेपणातून उमलणारी विरतीची धुंदी हा पुन्हा भारतीय संस्कृतीचा वारसा आहे. एकाच वेळी योग नि भोग यांचा सम्राट असणाऱ्या शिवाला देव मानणाऱ्या इथल्या परंपरेचा तो वारसा आहे. म्हणून एक तर गोविंदाग्रजांना भोगायला लागलेली प्रेमातली 'खंती' आणि भळभळणारी वेदना बोरकरांच्या प्रेमकवितेत आढळायची नाही आणि दुसरे म्हणजे गोविंदाग्रजांप्रमाणेच हाडामांसाच्या प्रेयसीवर उत्कट प्रेम करतानाही तिच्या आत्मिक शक्तींना झोंबून ऐहिक.पलीकडच्या एका पातळीवरही ती पोहोचू शकली आहे.

अर्थात् बोरकरांच्या प्रेमकवितेतली ऐहिकाची धुंदी किंवा मस्ती ह्यामुळे कधी फिकी वाटत नाही. ती अगदी जातिवंत आणि रसरशीत आहे. केवळ परंपरेचे आणि संतकवींचे संस्कारच लाभते आणि बोरकर गोव्याऐवजी कुठे तरी देशावरच्या एखाद्या खेड्यात असते तर? तर कदाचित् हा प्रेमाविष्कार राधा-कृष्ण-प्रीतीसारखा, त्यासारख्या विषयांपुरताच मर्यादित झाला असता—सांकेतिक झाला असता. पण परंपरेतून त्यांच्या प्रेमभावनेला विस्तीर्ण सांस्कृतिक आणि प्राक्कथात्म संदर्भ तर मिळाले, मात्र परंपरागत विचारांनी प्रेमभावनेला येणारा दबलेपणा आणि संकोच मात्र आला नाही. याला कारण म्हणजे गोव्याच्या रंगधुंद निसर्गाची नि मनमोकळ्या लॅटिन संस्कृतीची देणगी आणि दॉन प्रॉपेर्सिय कुरैय आफॉंसु ई फिगैरेदु या विदुषीने दिलेली सौंदर्याची दीक्षा— ग्रीकांची सौंदर्यदृष्टी आणि भारतीयांचे आत्मदर्शन यांचा संयोग बोरकरांमध्ये

व्हावा ह्या इच्छेने तिने केलेले त्यांच्या अभिरुचीचे भरणपोषण या विशिष्ट व्यक्ती-परिस्थितीमुळे बोरकरांची प्रेमदृष्टी अतिशय निकोपपणे मोकळी आणि रसरशीत झाली.

बोरकर सांगतात की, सुदैवाने त्यांना फार समृद्ध प्रेमजीवन लाभले. आयुष्यात वेळोवेळी भेटलेल्या ह्या समृद्ध प्रेमाला बोरकर खुल्या रसिकतेने सामोरे गेले. त्यामुळे प्रेमातल्या विचित्र गाठी-निरगाठींनी बोरकरांच्या मनाची ओढाताण कधी झाली नाही. कवितेत कधी विचित्र ताण आणि कुढी किंवा मत्सरी झाक उमटली नाही. पत्नीविषयी क्रमाने गाढ आणि स्निग्ध होत जाणारे अन् प्रेयसीविषयी उकळत्या मादकतेतून क्रमाने सौम्य समजुतीकडे येणारे प्रेम असा प्रवास बोरकरांच्या प्रेमकवितेत पहायला मिळतो. सुरुवातीच्या संग्रहामध्ये हे प्रेम थुईथुई नाचणाऱ्या कारंजासारखे आपल्याच मस्तीत बेभान होऊन नाचताना दिसते अन् शेवटी 'कांचनसंध्ये'त ते सुखावर धरलेल्या सायीसारखे दाट, सौम्य, स्निग्ध झालेले दिसते. नदीचे पात्र क्रमाने रुंदावत जावे, तसे रुंदावलेलेही दिसते. शारीर प्रणयाचा पहिला जोष पुष्कळ ओसरलेला दिसतो. वृद्धपणाच्या छायेत हे प्रेमही सांध्य प्रकाशाइतकेच सुंदर सोनेरी पिकलेपण धारण करते एक मात्र खरे की, ह्या वयाच्या संदर्भाखेरीज बोरकरांच्या वैयक्तिक प्रेमजीवनाचे थेट संदर्भ त्यांच्या कवितेत उतरताना दिसत नाहीत. वैयक्तिकापासून या बाजूने बोरकरांनी आपल्या प्रेमकवितांची नाळ फार योग्य रीतीने कापली आहे आणि तिला सार्वत्रिकतेचा नि सार्वकालिकतेचा एक रम्योज्ज्वल स्पर्श प्राप्त करून दिला आहे.

हा सार्वत्रिकाचा आणि सार्वकालिकतेचाही स्पर्श बोरकरांच्या प्रेमकवितेत येतो तो दोन पातळ्यांवर—दोन प्रकारांनी. पहिली पातळी प्रेमाच्या शारीरिकतेची. प्रेमाचा शारीर आविष्कार बोरकरांनी गौण तर कधी लेखला नाहीच, पण अतिशय रसिकतेने, सौंदर्यात्म दृष्टीने आणि थक्क करणाऱ्या धुंदीने त्यांनी तो मिरवला. सर्वेंद्रियांना रोमांचित करणाऱ्या बोरकरांच्या प्रणयप्रतिमा केवळ अविस्मरणीय म्हणाव्या लागतील. पूर्णतः ऐंद्रिय असा हा रतिरंग 'जपानी रमलाची रात्र'सारख्या त्यांच्या कवितांमधून कसा फुलतो हे पाहिले, म्हणजे या कवितांना 'ऐंद्रिय साम्यविहार' असा त्यांचाच उद्गार काढून वर्णावेसे वाटते. शारीर प्रणयाची अनेक प्रकारची खुलावट, त्याचे विभ्रम, त्याची धुंदी आणि त्यातली उत्कट आनंदमयता, त्यातले रसलाघव आणि त्यातली प्रेरक प्रसन्नता यांचे एकाच वेळी तप्त कांचनासारखे भाजणारे आणि चंदनी उटी-सारखे शांतवणारे दर्शन या प्रेमकवितांमधून घडते. या शारीर प्रणयाला बहुधा साऱ्याच कवितांमधून तृप्तीचा एक भरघोस टिळा लागलेला आहे. स्त्री-पुरुषांच्या एकमेकां-मधील नैसर्गिक आकर्षणाचे शारीर पातळीवरचे प्रकटीकरण मराठी कवितेत अन्यत्र इतक्या मनोज्ञ उल्हसितपणे क्वचितच व्यक्त झालेले आढळेल.

सार्वत्रिकाचा स्पर्श ज्या दुसऱ्या पातळीवर बोरकरांच्या प्रेमकवितेला होतो, ती

ंतळी स्त्रीविषयी पुरुषाला वाटणाऱ्या गूढ आकर्षणाची नि कुतूहलाची. स्त्रीच्या सर्जनशीलतेविषयीचे कुतूहल आणि रहस्यमयता, तिच्या अंगी असणारी जीवनपोषक प्रेममयता आणि जीवन उद्ध्वस्त करू शकणारी क्रूरता, या उभयविध रूपांचे संस्कृति-संभारात घडलेले अवतरण आणि त्यातून तिच्याबद्दल निर्माण झालेली आदराची, पूजेची भावना या सार्वत्रिक आणि सार्वकालिक भावनेचा स्पर्श बोरकरांच्या प्रेम-कवितांना फार गडदपणे झाला आहे. 'तव नयनाचे दल हलले ग' यासारख्या अनेक कविता याची साक्ष देतील. या स्पर्शाने कधी कुठे प्रेमभावनेतली सहज मधुरता हरवली आहे; आणि त्यातली शब्दांची गर्दी कधी हृद्यतेशिवायच संस्कृति-संदर्भांना खेचते आहे. पण असे क्वचितच घडते. प्रेमातला कोवळा मानवी भाव टिकवूनही त्यातले अलौकिक आकर्षण जागवणे बऱ्याच वेळा बोरकरांना शक्य झाले आहे—स्त्रीचे आपल्याला घडणारे प्रेमगर्भ दर्शन तिच्या आदिम प्रतिमेत परिणत करणे शक्य झाले आहे.

बोरकरांच्या प्रेमकवितेचे एक वैशिष्ट्य म्हणजे तिच्यातील आसक्ती-विरक्तीचा संगम. बोरकरांनी प्रेम ही एक सोपानकल्पना मानली. सौंदर्याच्या अंगाने प्रेम हे सर्जनाला आणि शिवाला जाऊन भिडू शकते. म्हणून प्रेमभावनेचा सौंदर्यात्म विकास—तिची उन्नती बोरकरांनी घडवली आणि तिला शिवस्पर्शाचे एक सुंदर विलेपन केले. प्रेम हा जीवन पैलतीरी नेणारा परमार्थाइतका प्रभावी मार्ग त्यांनी मानला. अर्थात् हाही परंपरेतून मिळालेला तत्त्वविचार आहे. बोरकरांनी त्याला आपल्या प्रेमकल्पनेची बैठक मानले आणि 'रती असुन मी सती' असा वरवर विलक्षण विरोधाभासात्मक वाटणारा, पण इथल्या मातीतून त्यांच्या मनात मुरलेला विचार त्यांनी परोपरीने आपल्या प्रेमकवितेतून नटवला.

ज्ञानदेवांच्या रचनापद्धतीचा अनुकार करीत बोरकरांनी बऱ्याच कविता लिहिल्या. 'आतला आतला सये' किंवा 'घरचिये बांये जोइली बिंदुली' यांसारख्या कवितांमधून बोरकरांच्या कल्पनाविलासाने रोमांचक उची गाठलेली दिसते. संतवाणीतला गोडवा मुळीही न उणावता इथे भेटतोच; शिवाय संतांनी परोपरीने समृद्ध केलेली राधाकृष्ण-प्रीतीची संकल्पनाही वेगळ्या दीप्तीने उजळताना दिसते. बोरकर हे पारंपरिक अर्थाने मराठी कवितेतले मधुराभक्तीचे आधुनिक अवतरण नव्हेत. ईश्वर हा पुरुष आणि आपण प्रेयसी अशी भूमिका घेऊन बोरकरांनी 'हरिच्या स्मरभुवनी' यांसारख्या फार मोजक्या कविता लिहिल्या आणि त्यांवरही मराठी संतमंडळाच्या वाणीचा प्रभाव अधिक आहे. बोरकर हे नव्या संदर्भात मात्र पराप्रीतीचे प्रतीक असलेल्या राधाभावाने भारलेले आहेत. राधेची प्रतिमा त्यांच्या समग्र काव्यविश्वाला अप्रत्यक्ष स्वरूपात व्यापून राहिलेली आहे. प्रीतीची सारी उत्कटता, समर्पणशीलता अन् ऐंद्रिय पातळीवरची धुंदी अनुभवूनही अतींद्रियाचे अमृतपान घडविणारी दिव्यता त्यांनी राधेच्या प्रतिमेत

अनुभवली आहे. पिवळ्या लिंबाचे रसरसलेपण जिच्या अंगांगांतून निथळत आहे, अशी तांबूस गोरी राधा कृष्णदर्शनाने क्षणात कशी श्यामल होते, हे बोरकरांच्या प्रतिभेने पाहिलेले आहे.

'ज्ञानियांच्या माऊलीची नित्य ओवी' ही बोकरांना अत्यंत प्रिय आहे किंबहुना तो त्यांच्या जीवीचा जिव्हाळा आहे. 'रात्री समईशी वाचावी ज्ञानेशाची अमृतओवी' ही त्यांची आंतरिक ओढ आहे. या अमृतओवीच्या ओलाव्यानेच त्यांच्या स्फूर्तीचे चंद्रबिंब पालवले आहे. 'अंतरीचा ज्ञानदिवा' अखंड तेजाळत ठेवणारे सोहिराबा आंब्रिये अन् 'आनंदाचे धाम' असलेल्या विश्वविश्राम रामाचे नाम वाचेने नित्य गाणारे कृष्णंभट बांदकर यांनी जरी बोरकरांना गीतरचनेचे पाथेय दिलेले असले, तरी जीवनाच्या आनंदयात्रेत जठरातूनच अमृताचा निर्झर झरावा, हे देणेही त्यांना ज्ञानदेवांपासूनच लाभलेले आहे. त्याचमुळे ते ज्ञानदेवांना क्षणभरही विसरू शकत नाहीत. 'ज्ञानेश्वरी अकराव्या वर्षी माझ्या हाती आली... आणि अजून मी ती वाचतो आहे, तेव्हा हे सार वैभव त्या मायमाऊलीचे!' अशी ज्ञानेश्वरीविषयीची कृतज्ञता त्यांच्या हृदयात निरंतर नांदत होती. 'आळंदीची भगवी वाट' त्यांच्या अंतरंगात एक हळवी ओढ बनून रेखली गेली होती.

हे एवढे दृढतेचे नाते बोरकर अन् ज्ञानदेव यांच्या प्रतिभेच्या समरूपातून निर्माण झालेले आहे. ज्ञानदेव हे शिवशक्तिसमावेशनाच्या आंतरिक अनुभवाचे गायक, 'देवोदेवी'च्या पराप्रीतीचे पाईक, ब्रह्मरस शृंगारप्रतिमांतून रूपवान् करणारे, ऐंद्रिय प्रतिमांच्या द्वारा अतींद्रियाचा अनुभव घडवणारे महाकवी. 'प्रीतीची जाती लाजणे। आठवों नेदी' किंवा 'रोषें प्रेम दुणावटे। पढियंताचेनि' असे प्रेमाचे सिद्धान्त लीलया प्रकट करणारे ज्ञानदेव हे 'कवी' बोरकरांचे 'आद्य पूर्वज' आहेत, हे आपल्याला क्षणभरही विसरता येणार नाही

सारे स्थिरचर विश्व हे एकाच चैतन्याने अंतर्बाह्य भारलेले आहे– किंबहुना हे चैतन्य जसे विश्वात्मक आहे, तसेच विश्वातीतही आहे, असे ज्याला प्रातिभ दर्शन घडलेले आहे, त्याच्या लेखी पार्थिव आणि अपार्थिव यांच्या सीमारेषांना अर्थ राहत नाही. त्या सीमा चैतन्याच्या प्रकाशलाटांत पुसून जातात. ज्ञानदेवांच्या वाग्विश्वात विहार करताना बोरकरांनी हा अनुभव आयुष्यभर घेतला, हे सत्य आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ज्ञानदेव बोली अरूपाचे रूप दाखवितात, अतींद्रिय इंद्रियाकरवी भोगवितात अन् ऐंद्रिय अनुभवांना सहजी अतींद्रियाच्या पातळीवर पोचवितात. 'प्रथमवयसाकाळी अंगनेच्या अंगी जी आगळी लावण्याची नव्हाळी प्रकटते,' ती ज्ञानदेव रसरसलेल्या लिंबाप्रमाणे तुमच्या दृष्टीपुढे उभी करतात, परंतु त्या नव्हाळीच्या प्रतीतीच्या क्षणीच तिच्या माध्यमातून ते महाभारताच्या आशयपुष्ट सौंदर्याच्या आगळेपणाचा प्रत्यय घडवितात. चंद्र गगनात उदय पावताच कुमुदिनी त्याला आलिंगन देते, असे ऐंद्रिय

पातळीवरच्या प्रीतीचे अनुभवचित्र ज्ञानदेव लीलया रेखाटतात; परंतु 'आपुला ठाय न सांडिता' तिने चंद्राला आलिंगन दिले आहे, हे सांगायलाही ते विसरत नाहीत. त्यामुळे ऐंद्रिय पातळीवर रंगणाऱ्या प्रेमानुभवाचे भान घडविणाऱ्या प्रतिमांचा वापर करूनही ते आपला अभिप्राय अतींद्रिय पातळीवर राखू शकतात.

हे ज्ञानदेव प्रतिभा, प्रज्ञा अन् प्रतीती या तीनही बाबतींत बोरकरांचे आदर्श होते. ज्ञानदेवांच्या अन् त्यांच्या प्रतिभेची कुळी एक होती. ज्ञानदेवांची प्रज्ञा अन् प्रतीती यांविषयी बोरकरांना एक स्वप्निल ओढ होती. 'महात्मायना'त ती ज्ञानदेवांच्या महाकवित्वाविषयी बोरकरांना वाटणाऱ्या असाधारण आकर्षणातून प्रकटली आहे, तर अनेक गीतांत–प्रेमगीतांत ती ज्ञानदेवांच्या असाधारण गीतसर्जक शक्तीविषयी त्यांना वाटणाऱ्या आकर्षणातून व्यक्त झाली आहे.

घरचिये बांये । जोइली बिंदुली
ओंजळिये संचली । यमुना गे माय
प्याले तशी धाल्ये । गवळण जाल्ये
साखरेचे आळे । मन खिरले गे माय
पावले पावली । तेथे राने पाल्हवली
सुगंध-साउली । फळे लवली गे माय
जाले दशनाद रावे । लक्ष निनादले पावे
सुख जाणिवे न मावे । ते मज फावे गे माय
मिटता नयनु । दिठी मुसावला घनु
पोटी देवकीनंदनु । मज झोंबला गे माय
नेत्रांविण चित्रवती । पतीविण पुत्रवती
निळा बाळकृष्ण ओटी । माझ्या खेळे गे माय (पृ. १०९)

मी मागे उल्लेखिलेली ही बोरकरांची कविता-प्रेमकविता आहे, की ज्ञानदेवांनी रचलेली एक गवळण कुणी त्यांच्या नावावर उतरून घेतली आहे, असा संभ्रम निर्माण व्हावा, एवढी ज्ञानदेवसरणी बोरकरांनी 'आत्मसात्' केली आहे– केवळ अभिव्यक्तीच्याच अंगाने नव्हे, तर प्रतीतीच्याही अंगाने. 'गे माय' या कोवळ्या संबोधनाची आवृत्ती, प्रथमेचा श्रुतिसुखद उकार, विरोधातून महासंवादाचा नि द्वंद्वातून अद्वयाचा परानुभव व्यक्त करण्याची रीती, तसेच गीताच्या आशयपरिणतीत अपरिहार्यपणे यावी, अशा पद्धतीने सूचकतेने कविनाममुद्रा गोवण्याची युक्ती– हे सारे विशेष या गीतात थेट ज्ञानदेवांच्या गीत-संस्कारातून आलेले आहेत. ज्ञानदेव हा बोरकरांचा स्वप्नादर्श (Nostalgia) होता, यात मुळीच संशय नाही. या आदर्शामुळेच त्यांना हे

अत्यंत प्रांजळपणाने पटलेले होते की, एका क्षणी विरागाच्या तृतीय नेत्रातील दाहकतेने मदनाला भस्मसात् करणारा शिव हा दुसऱ्या क्षणी गौरीच्या गात्रांच्या नंदनवनात अनंत काळ विहार करायला प्रवृत्त होतो, हे केवळ योगिराजालाच शक्य आहे. संध्येच्या वेदीवर तिमिर आणि तेज यांचा मीलनोत्सव साजरा करण्याची ही कला ज्यांना साधली, त्या दैवी शक्तीच्या कलावंतांपुढे बोरकर नेहमीच नम्र होत असत. त्यांना याचे सतत भान होते की, सीमांत अडकलेले प्रेम हे ज्यांनी विरागाच्या बळाने असीम बनवलेले असते, त्यांचा विराग हाच विराट अनुराग बनतो. त्यांच्या लेखी मग विराग हा विगतराग न राहता विशेषानुराग होतो. विराग आणि अनुराग यांचे हे परस्परानुरक्तित्व गौतमाला कळले होते; म्हणून तर बोधिवृक्षातळी दीर्घ तपानंतर बुद्धावस्था प्राप्त केल्यानंतर सुजातेच्या पात्रातले पायस पिऊन त्याने आपल्या व्रताचे पारणे साजरे केले होते. बोरकरांच्या कवितेत, गौतमाच्या या अनुरागांकित विरागाचे निर्देश अतिहळवे-पणाने येतात, ते याचमुळे.

माती अन् ज्योती यांच्या नात्याची ही दृढता बोरकरांच्या प्रेमकवितेतून ओसंडून वाहत आहे. मातीच्या आश्रयाविना ज्योतीचे अवतरण अशक्य आहे, अशी त्यांची धारणा आहे. 'शरिराच्या तृष्णेविण रस कुठला प्रीतीला?' हा त्यांचा निर्णयात्मक प्रश्न आहे अन् 'विरहाने झुरल्याविण द्रव नाही गाण्याला' ही त्यांची स्पष्ट कबुलीही आहे. माती-ज्योतीच्या नात्याची ओढ अत्यंत सुंदर अन् उद्दाम भाषेत व्यक्त करताना त्यांनी म्हटले आहे :

ये, हे सखि, मातीचे आश्वासन घेउनि ये
प्रीतीवर विश्वासुन उन्मनमन होउनि ये
ये दिठीत, ये मिठीत, भेट पेट घेत जरा
शत ज्योतींमधुनि करू मातीचा हेत पुरा

३० नोव्हेंबर १९८४ **रामचंद्र चिंतामण ढेरे**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५७१
दा. क्र. २४४५०
दिनांक २८/१२/७४
ग्रंथ : शाखा (स्थळ प्रत)

## माझी आगबोट

माझी आगबोट चालली दर्यात ग, दर्यात ग
मन धावत तरी तव हृदयात ग

हळुहळु पाण्यामधी जुने जग बुडे
निळ्याकाळ्या दर्यावर दैव स्वैर उडे
तुझ्या चिंतनाने दील तरी धडधडे
वर खाली लाटेवरी हेलकावे खात ग !

पाचूवाणी जळावरी मोत्यांवाणी फेस
खेळताना म्हणे माते, "मोदे बाळा हास"
पिशावाणी उदास मी, एक तुझा ध्यास
पाचूवाणी नेत्री तुझ्या मोती ठाव घेत ग !

नारळीचे वृक्ष स्तब्ध प्रेमस्तंभ उभे
पर्णआड पक्षी जणु भाव हृदी दबे
धरितात अश्रु हृदी केळियेचे गबे
हेमंताचे दीस तरी हृदी उष्ण वात ग !

आशेने मी आकाशात पाहियले जधी
तुझी प्रेमपुष्पे शुभ्र आली वाटे तधी
परी हाय ! पक्षी ते ग स्वैर वाऱ्यामधी
सान बाळापरी मज कुणी फसवीत ग !

मुंबई, १·१२·२९

## प्रणयमुग्धेस

नादांत गुंगसी जे शब्दांत सांग बाले
आषाढच्या घने का त्वन्नेत्र भारलेले ?

होसी रसार्द्र केवी झुकतेस द्राक्षवेली ?
ओठांत वेदनेची मदिराहि साठलेली !

पायांस अंतराचा का भार साहवेना ?
का बोल घोळलेला ओठांतुनी सुटेना ?

का सावलीत तुझ्या बघतेस बावरून ?
भलतीच लाज मेली वद गे सखे त्यजून

घे शेत हेलकावे तव का विळी न चाले ?
नादात गुंगसी जे शब्दांत सांग बाले

मुंबई १३·१२·३०

# परिचये प्रेम तव जाइल का?

येता जवळी मी पळशिल का ?
फिरता मागे मग वळशिल का ?

विखरुनि जादू तुझ्या फुलांची
भूक वाढविसि मूक जिवाची
गुंगत येता हुंगायासी
गुलाब गे तव चुरतिल का ?
काटे माझ्या मनि खुपतिल का ?

भ्रमणचतुर भ्रमराची जोडी
लावी हृदया गायनगोडी
गात पाकळी फुलवुनि सोडी
कवळुनि धरिता कोरिल का ?
भांडार आतले चोरिल का ?

तव हृदयी शुक्राचा तारा
मम आत्मा जणु प्रभात-वारा
येता वाहाया दवहारा
ढगात त्याला गिळशिल का ?
मग काळिज माझे पिळशिल का ?

तव हृदयाच्या पाणभुईवर
मृदुल पदे मी फिरता झरझर
आले जर कधि वादळ दुस्तर
लहरींवर झेलशील का ?
खडकांवर वा आदळशिल का ?

स्नेह आमुचा मूकपणाचा
कल्पनेत आनंद मनाचा
वास्तवात तो जरि जायाचा
घाल पुढती पाउल का ?
परिचये प्रेम तव जाइल का ?

वास्को, ४·३ ३१

## ती न सां जा

तीन सांजा जाहल्या मी बावरे आतून का ?
जीवघेणी वाजवीसी वेणुची का गीतिका ?

वाटकी रे प्रेमगाणी छंद जीवा लाविती
बद्ध पाशी रेशमाच्या जाहले मी मालका

छेडिसी का बासरी रे बैसुनी वातायनी ?
देति ठेका, मानसीही त्वत्पदीच्या पादुका

मत्करींची, मन्मनींची वात कंपे साजणा
बासरीच्या, त्वन्मुखाच्या सोसवेना रे सुखा

चोरचाली रात येई मंदिरी, हृन्मंदिरी
जीव हा सारा फुले, सांडे उरी रे चंद्रिका

लाविता कुंकू सख्या रे अंगणी वृंदावना
नेत्र हे, हा जीवही पाहू बघे तूतेच का ?

सूर जे तू काढिसी आंदोलते मन त्यांवरी
वाहते श्वासी तुझ्या ते देतसे टाळ्याच का ?

सोसवेना यापुढे रे ! सुस्वरांच्या टाचण्या—
लागुनी मी विव्हळावे ही तुझी इच्छाच का ?

" रातवेळी वेणुनादे नाग येई मोहुनी—"
–माय बोले, हाससी तू—हे तुला समजे न का ?
" रातवेळी वेणुनादे नाग येई मोहुनी "
मी म्हणे, म्हणसी परी तू, " वृद्ध ती, तू बालिका "

बोरी, १९३१

## सा यु ज्य मु क्ती

तू प्रेमिक मी तव प्रियकरिणी
तुज आळविता गेले फुलुनी !

प्रभातरवि तू मी नव कमलिनि
शीतल शय्या किति तुजवाचुनि
वायु तशातहि भलते वदुनी
करि असह गुदगुल्या फिरफिरुनी !

तव ऊबेस्तव तनु शिणशिणते
येता जवळी परि बावरते
लाज गुलावी किती शिरशिरते !
हो असह्य ! ये पाकळि उलुनी

सोन्याच्या तव हृदयी पोहुनि
मन रे माझे गेले हुरळुनि
तुझ्यात गेले विश्व लोपुनी
मज तुजविण काही न ये दिसुनी

स्पर्शे तव, मम हृदय थरथरे
बिंब तुझे आतुनी झुरुमुरे
गोड विश्व हे, मधु जीवन रे !
धर अशीच मज नित आवळुनी

दृढालिंगनी तुझ्या मरावे
प्रतिकिरणी तव मिसळुनि जावे
प्रणयाच्या ज्योतीत जळावे
क्षण एक योग पार अनुभवुनी.

म्हापसे, २६·२·३२

# आणि मज माउलीच जाहली

कोमल बिल्वदलांवर हिरव्या, धवल जाइचा सर
तशी ही निद्रावश सुंदर
बालकवीची विमुग्ध प्रतिभा, निश्चल मंदाकिनी
तशी ही शांत विमल मोहिनी
अरुण हिच्या गालांवर, हृदयी सूर्यबिंब रंगले
तनूवर वस्त्र अभ्र पसरले
ही वासंतिक उषासुंदरी हिमनगदेशातली
आपुल्या स्वप्नातच रंगली
जीवनगंधी हिच्या वाहते कल्पांचे गायन
जयावर स्मृतिचे संमोहन

ही उषा जगाची भुवनी मम उगवली
की सदेह शारद वैणिक श्वसनावली !
की भावातीता पराच सुखसाउली !
पार्थिवतेच्या क्षितिजापुढती जाउनि ही राहिली
आणि मज माउलीच जाहली

पणजी, ३०·६·३२

## विरोधी भक्ती

निष्ठुर किति हृषिकेशी ? रे तू

जपता वरि वरि
येशि लपुनि घरि
गुपिते चोरुनि नेशी रे तू

दोष अमित तव
गणिता मम जिव
हलके चित्त हरीसी रे तू

तुजशि अबोला
धरिता मजला
भलती जवळिक करिशी रे तू

ढकलिता तुशी
अधिक बिलगशी
शिथिल तनू ही करिसी रे तू

दुराविता तुज
सुस्वर हितगुज
घालुनि ओढुनि घेशी रे तू

तुझ्यावरुनी मन
विसरविता क्षण
अधिकचि घरचा होशी रे तू

तुला चुकवुनी
रमता स्नानी
लुगडे चोरुनि नेशी रे तू

दार लाविता
तुला अनंता
तत्रपणि मंदिर भरसी रे तू

दीप शमविता
नयनहि मिटिता
मनी प्रकाशुनि हससी रे तू

पणजी, २७·९·३२

## कशि तुज समजावु सांग?

कशि तुज समजावु सांग?
का भामिनि उगिच राग?

हास्याहुनि मधु रुसवा
हेमंती उष्ण हवा
संध्येचा साज नवा
हा का प्रणयानुराग?

चाफेकळि केवि फुले?
ओष्ठकमल केवि उले?
भोवति मधु गंध पळे
का प्रसन्न वदन-राग?

वृत्तींचा होम अमुप
त्यात जाळु गे विकल्प
होउनिया निर्विकल्प
अक्षय करु यज्ञयाग.

ओठांचे फेड बंध
गाइ गडे मुक्त छंद
श्वासांचे करु प्रबंध
हृदयांचे मधु प्रयाग

पणजी, २६·१०·३२

## येइ सखी

येइ सखी हंसतमुखी हळु हळु वर जाऊ
अणुअणुंनी पार्थिवता गाळित जग पाहू.

नील गहन शांत गगन
विरल त्यात चंद्रकिरण
जणु अथांग आर्द्र नयन
ही शराब प्राशुनि बेफाम धुंद होऊ

पर्णांचे मृदु कंपन
लहरींचे आंदोलन
कलिकांचे तरल श्वसन
नसनसांत खेळवीत विकलगात्र होऊ

शीतलतेचे अंजन
वायूचे रूप धरुन
स्फूर्तीचे पंख करुन
या अनंत विस्तारी रंगुनी तरंगू.

शीतल करु चंद्रासन
या अथांग यमुनेतुन
संगम-उत्सव करून
कणकणांत हिम भरीत शांतकाय होऊ.

बोरी, १४·११·३२

# गोड कळ

परलोकीही दुर्मिळ सजणा अंतरंगिची कळ

सल नाजुक सलता मनी
येतात स्मृति बहरुनी !
क्षण वाटे जीवन सायंकालिन सलील उज्ज्वल जळ

तू गुदमरविसि चुंबिता
कडकडुनी आलिंगिता
मग करिता कुडिची घडी गोड ये जीवाला भोवळ

ढग कौलारी कोसळे
घरि पुरति न समई जळे
परि याच अवेळी मिळे मला तव उबाळ वक्षस्थळ

जग गहन सतीचे मन
सुखदु:खाचे मीलन
करि अनलमंचकी शयन प्रणयिनी सोनसळी केवळ

मन अपुले जळता दिवा
भिलभिले हालता हवा
परि उजळी अवघे त्रिभुवन जरिही माथ्यावर काजळ

बोरी, ११·५·३३

# तुझी माझी प्रीत

तुझी माझी ग प्रीत साजणी चांदण्यातली लावणी ग
किती अशी ही फुलं गुंफायची मनात फुलला मळाच ग
किती करांना शीण द्यायचा, हार तयांचा कोवळाच ग
शरावीत ना मजा माधुरी ओठांचा पेला ओठाला ग
गार वाहु देत वारे सभवती काळजाची ऊब काळजाला ग
झेल घेउ या निर्धास्तपणे दैवाच्या दोल्यावर ग
जरा कुठं धडधडलं जर उरि रेल जिवावर सत्वर ग
कल्पकल्पवर विलास करुनी लाटांवर करु प्रवास ग
फेनापरि दशदिशांस उधळू हृत्सुमनांचा सुवास ग

१९३३

# मु शा फि रा !

चालसी किती जगे किती युगे मुशाफिरा ?
एकटेपणा तुझा असह्य हो चराचरा !

सांज दाटली शिरी
परतली घरा भिरी
सावळ्या रुखावळीत धूर मात्र कापरा

स्तब्ध मार्ग तांबडा
वळत जाय वाकडा
मोडक्या पुलाकडून तार जाय बंदरा

काळवंडली जळे
चिंचही न सळ्सळे
वाटते भयाण सर्व ! सलत आत कातरा

आसपास ना कुणी
भय भरे उगी मनी
एक रात्र होउया परस्परांस आसरा

या इथें वडातळी
पाय टाकुनी जळी
जागुनी वदू कितीक काल गुंफुनी करां

शीणभाग घालवू
अन् विकल्प मालवू
प्रीतिची निगूढता निशेत आणु या भरा

आपुले झरे मुके
करु जुळून बोलके
गात गात विस्तरून भेट देउ सागरा

बोरी, १८·४·३४

# गेले भिउनि मनात !

सखे मी गेले भिउनि मनात !
कळंजले मन, स्थिरचर जीवन गहिऱ्या अंधारात

निष्ठुर वारा उखडि तणारा वात न ठेवि घरात
दगडफेकिपरि सणसणल्या सरि, चमके वीज पुढ्यात !

घरे पाडिती रातकिड्यांचे भेसुर रव हृदयात !
नाथाविण मी होते एकटि भरल्या संसारात

दूर देखिला पिंपळ नटला अगणित खद्योतांत
नकळे कोठुनि तोच दाटला दरवळ निमिषार्धात !

प्रीतीचा मधुवेल मोगरा फुलला गऽ परसात !
गेले धावुनि दारी पडले प्रभुच्या करपाशात !

पणजी, १४·७·३४

## संधिकाल

परसातिल आंबा बघ आला फळभारे रंगा
चपळ चानिया धावत तुरतुर झटती सर्वांगा
वासंतिक धुंदी घोटाळे अजुनी पानांत
कोकिल-कूजित मंजुळ घुमते अजुनी कानांत

आठवर्णांच्या चित्रांचा शिरि हिरवा संभार
मावळता रवि उधळी त्यावर कांचन-भांडार
आणिक खाली गाढ पसरली छायांची जाळी
येइ श्यामले, बसू घडीभर बोलत या काळी

एकांतातिल गोड करू या ही रक्तिम घटका
माधुर्याचा भार फळांचा अधरे करु हलका
याच फळांपरि रसाळ मोहक माझेही शब्द
ओठांनी तू का नच करिसी मग त्यांचा भेद ?

चपळ पिसोळी चतुर चोरटी भुरभुरती जवळी
सावध ! सजणी, नेतिल अमुची कानगुजे सगळी
चावट ! उष्टी शीर मुखी मम घालुनिया अर्धी
दीस गिमाचे असुनि गडे का करिसी तू गर्दी ?

मडगाव, २१·४·३५

## हिरकणी

दिली मला हिरकणी
तुवा एकान्ताच्या पारी
चोरी मला ठेवायाची
परी जगाच्या बाजारी

अंधारल्या आसमन्ती
कुढला जो जीव माझा
तिच्या तेजा देखुनीया
निमिषार्धे झाला ताजा

दोन गुंज नाही सोने
चंद्रमौळी झोपडीत
विश्वमोलाचे हे रत्न
जडवाया कोंदणात

तुझी दौलतही थोर
सुरक्षित ठेवायाला
स्थळ उरावीण माझ्या
नाही आले गे वाट्याला

नाही तुला, नाही मला
जीव कावरे बावरे—
नशिबाची, जीविताची
दोरी गडे थरथरे

तुझ्या माझ्या डोळां आता
येइ दाटूनिया रडे
सोसवेना तिची माया
पोटी तुटते आतडे

हिरकणी देउनिया
तू या लोकी नागवली
घेउनिया माझी वेळा
मीच जवळ आणिली

बोरी, २४·८·३५

—स

शरद्ऋतूचे ऊन सांडले होते मन-रानी
फूलपाखरापरि तू आलिस रंगांची राणी
स्तिमितपणातचि विरली माझी उच्छृंखल गाणी
नकळत नयनीं आले व्याकुळ कसलेसे पाणी

आणि वाटले जिवा, पाखरा ! उडतच बिलगावे
सलगीने तव सार्थक सगळ्या वृत्तींचे व्हावे
तुझ्या दर्शने प्रथमच गमले मी आहे दु:खी
जिवलग जग हे सदैव पुढती होइल आशंकी

असुख असे हे गोड निर्मिले अंतर्मुख केले
वज्र मनीचे संस्कारांनी दुखवुनि उजळविले
असह्य झाले तेज तयाचे या दुबळ्या जीवा
जरी तयाने वैभव चढले विस्मृत मम नावा

अदृढ असल्या सुखद क्षणाला आलिस तू अदये
न मागिता तू मागितले जे मीही देउ नये
आज राहिला एकच जरि मज गहिरा अंधार
सतेज त्याची स्वप्ने मजला होती आधार

पणजी, ६·११·३५

# उरले घरटे दूर!

पंखांवरती रंग झेलुनी गळ्यात स्वर कोवळे
हिरवे जग भवतीचे केले उडता उडता निळे

इवल्या पंखां अंतराळ ते आले ना आवळू
जीव भुकेला देहासंगे हळू लागला गळू

तो सोन्याच्या उन्हीं देखिले सजीव कण सानुले
झुकली चुकली झेप, गुंतली जाली या पाउले

जाल न ते तव हास्य चंचले, कण ते दशनांकुर
हाल मांडिले माझे जरि तू गमसी मज सुंदर

अंतराल हरपले आणखी इथे गवसलो असा
उरले घरटे दूर, जाहलो इकडे वेडापिसा

संधि अशी साधुनी साजणी पंख नको कातरू
निळे पाचवे रहस्यमय जग नको स्वामिनी हरू

तुझ्या मनगटावरी खेळणे मला नको का गडे ?
विक्रमविरहित विलास तरि तुज काल किती आवडे ?

पणजी, १६-११-३५

## क्षणभंगुर जरि जीवन

क्षणभंगुर जरि जीवन सखे सुखसुंदर करु आपण
सखे ग ऽ शाश्वत करु आपण

मृदु मादक मुखचुंबने
दृढ निर्दय आलिंगने
जन म्हणो चिखल, शुभमंगल कमले उमलवुया त्यांतुन

जन अंजन नयनी भरो
तम गगनभरी विस्तरो
शुभ बकुलफुली तेथल्या सजवुया सुखशय्या आपण

मृदु स्वप्नांची लोकर
करि भुरुभुरु वाऱ्यावर
धर, दुशाल जरिची विणू हिमांतरि वसंतसुखसाधन

करु गोड कुशीतच निशा
उतरवू जगाच्या विषा
चल मुलांफुलांमधि उषा फुलवुनी विकासवू जीवन
सखे गऽ प्रकाशवू जीवन

बोरी, १·१·३६

# नि रो प

प्रीति तुझी राहिल स्मरणी
जन्मजन्म मज जाळित उजळिल दिव्य ज्योति जी तव नयनी
अश्रुजले तव जाइल वितळुनि किल्मिष आमिष जे स्वमनी

दाहक मोहक निःश्वासांची दिधलिस सुमने सुरतरुणी
तेणे आला देवपणा मज पार्थिवता सगळी गळुनी

तव दुःखांच्या शिणगारांनी नटले तनमन दिनरजनी
प्रकाशभाषा एक उरे त्या रतण्या तव अद्वयभजनी

साक्षात्कारचि तुझ्या प्रीतिचा होय गमे मज प्रतिकिरणी
सत्य करुनि सौंदर्यसाज जणु ज्वलित स्मिते उधळी भुवनी

त्यागचि माझा भोग देवते ! घाव न कधि आणिन भरुनी
आजीवन वाहवुनी शोणित मांगल्ये न्हाणिन अवनी

म्हापसे, २३·२·३६

## आपण दोघे लहरी ग

गोड लबाडी झाली उघडी पहा पहा परतीरी ग
निळ्या महाली स्वर्णमंचकी विडा रंगला जहरी ग

लुले जोवरी झाले भाले
पंखहि नच जो वळले, गळले
दाहि दिशा जो रंगचि सगळे
आकाशभरी जुळी भर्जरी झर्कन् खेळु भरारी ग

सुगंध हिरवी कुजबुज रानी
सकंप जवळी व्याकुळ पाणी
निळी जांभळी गाई गाणी
करू बोलकी याच घडीला तनुतिल वीज रुपेरी ग

शीतल झुळुका झाल्या चंचळ
थरथरतो बघ तुझाहि अंचळ
सुकल्या काठा भिजवी बघ जळ
माझ्या ओठां आणिशील कधि कोमल ओल तरारी ग

आले जग जरि मागुनि सजणी
आपण उतरू सागरभुवनी
देहवेलि वर देऊ फेकुनि
सागरपोटी अमुच्यासाठी नवरत्नांची नगरी ग

कशास तनुचे अपणा बंधन
स्वैर विलासी उगीच अडचण
मिसळत भटकू अक्षय आपण
आज इथे तरि, उद्या कुठेतरि आपण दोघे लहरी ग

१९३७

## सावल्यांचे नृत्य

सावल्यांचे नृत्य माझ्या   चांदण्याच्या अंगणात
घननीळ वेदनांचे   लास्य तुझ्या गायनात !

अबोलीचा गोंड माझा   दिसायाला साधा भोळा
पोटी परी गाठ त्याच्या   ठावी माझ्या काळजाला

सुरंगीच्या सुगंधाने   डंख विसरला नाग
रात ओथंबली तरी   जाईना का तुझा राग ?

जांभ रंगा आला दारी   तळी गुलालाची रास
माघ मोहरला अंगी   जरा बिलगुनी हास

१९३७

## रा जा – रा णी

मी दुःखाचा राणा आणिक तू ग सुखाची राणी
ललाटिचे परी लेख हिंडती अपुले भिन्न ठिकाणी

दो चरणांपरि आलो गाया एकच जीवनगीती
कविमन चंचल त्यास न रुचली अपुली लौकिक प्रीती

खेद न करि सखि जाऊ आपण विहरत हसत तळाला
ध्वन्यर्थांची तेजोवलये शोधुनि आणायाला

जुळुनि कधीतरि नटवू आपण त्याची अमरा वाणी
मरणासम मी अद्‌भुत सखि तू चिन्मय जीवनखाणी

उधळ दिवसभर स्मिते तुझी जणु उन्हेच सांजसकाळी
त्यात खुलाया हिरवी स्वप्ने मी मम पसरिन खाली

देइन अरुणा हेमांगिनि तव हृदयीचा नजराणा
संध्यासमयी मन्मनकुंकुम लावी दिग्ललनांना

निशेसवे मी पसरिन नभभर माझी गहन निराशा
गाळ आसवे तूहि तियेवर तोडुनि पार्थिव पाशा

उडुगणमंडित गगन दुजे करु फुलवू सुम रात्रीचे
ऐकू तेजोगुंजन तेथिल मधुकर अंधाराचे

निशिदिनि क्रीडा करू अशी सखि रिझवुनि ते स्वर कानी
मी दुःखाचा राणा आणिक तू ग सुखाची राणी

१९३७

# ये पुढल्या दाराने

ये पुढल्या दाराने, ये रे हरि, ये पुढल्या दाराने

धीट जाहले मूर्ख मतलबी जगताच्या माराने
राखाया मुखदक्षण त्याचे टाकियले नवऱ्याने

देह आणि मन सख्या उजळले रात्रंदिन अपमाने
जगास कथु दे मला तुझी मी निर्भय कंठरवाने

दयिता तव जरि जगभर श्रीहरि करि तव मज अधराने
ये ये हासत सुरतवसंता ! फुलव तनूचीं राने

आनंदीआनंद करू मग चिन्मय रसभाराने
खुशाल जग मग म्हणो मला की विटाळिली जाराने

१९३७

# उर्वशीच तू जाया

क्षाळी पद संध्या
गांगजळा ये रंग मोतिया

गडे धुळीचे झाले सोने
किनारले गिरि रजतरसाने
मोरपिसांसम चमकति पाने
झाले जग मयमाया

शिरि अपुल्या खग वळिति तोरणे
शिंपडिती मोत्यांचे दाणे
मलयानिल नाचत मोदाने
लागति ते वेचाया

रत्नकांति ये दाहि दिशांना
अवचित दीप्ती तव नयनांना
ज्योतिर्मयता अपुल्या प्राणां
काया या जणु छाया

दीप उजळले हृदयी, ओठी
द्युतिनिर्झर ओघळले पोटी
स्पर्शे विश्वे अनंत कोटी
लागति ब्रध तेवाया

रंभाकृति तव मृदुल हिमानी
दृढ धरिली मी दोहि करांनी
अतीत तरि मज उरशी अजुनी
उर्वशीच तू जाया

१८·४·४०

## पाठमोरी पौर्णिमा

पाठमोरी मूर्ति तुझी पाहिली मी कौतुके
वाटले त्वत्कुंतली गे गुंतली सारी सुखे

भार त्यांचा गाढ काळा मेघ आषाढातला
का फुलांच्या मार्दवे मानेवरी भारावला ?

प्रीतिचा गे दूत माझा हा सुरंगीचा सर
खोवुनी तू कुंतली गे गोविले अभ्यंतर

हा न झेला गे फुलांचा--लाजरी सौदामिनी
वाकुनी केशी तुझ्या माते खुणावी हासुनी

काय आघाते तिच्या हे केस तूझे कापती ?
प्रीतिभावे चाळवोनी वा मला बोलाविती ?

कंप त्यांचा अंतरंगी जाय माझ्या खेळुनी
आणि त्यांचा वास माझा श्वास टाकी कोंडुनी

भाग मानेचा खुला हा गे बिजेचा चंद्रमा
अंबराच्या नीलिम्याला गे उणी स्वर्गोपमा

कांतिपाने धुंद झाले गर्द हे नीलांबर
पोत—छे ! स्वर्जान्हवीचा झोत हा पाठीवर !

पद्मिनी ! झाला करांचा गोड चाळा मोहक
आंगठीचा नीळ हासे रम्य संध्यातारक

होति पूर्वपश्चिमा आरक्त हस्तांचे तळ
कंकणी नक्षत्रपुंजा तेज आले शीतल

स्वर्धरेची धार झाली त्वत्कटीची रेख ते
देवता आपाद कोणी रम्य उर्मी लेखिते

कच्छ वाटे सिंधुपृष्ठी पंथ ज्योत्स्नामंडित
पाहुनी झाले किती गे प्रीतिभावे पीडित ?

स्वैर वाकी या रुपेरी-फेस खेळे सुंदर
पावलांच्या लालिम्याला भूमिची थोडी सर

पाठमोरी तू बिजेची रात्र लावण्ये रमा
हासुनी पाही वळोनी, होउ दे ना पौर्णिमा

२·३·४१

## माझी बेगम

माझी बेगम आली—प्यारी—माझी बेगम आली

मस्त मोंगली विलास सगळे उधळित ही भवताली
डोळ्यांतुनि वाळ्याचे अत्तर हासत हासत जाळी

केश रेशमी, गाल मखमली, अधरि शराबी लाली
वचनी बुलबुल, गायनि कोकिळ, कवनी पिक कुरवाळी

न्हाली ही शृंगाररसाने प्रतिभालंकृति ल्याली
सुमधुर स्वप्ने, दिव्य भविष्ये फुलवित गाली, भाली

श्वासे जाळी धूप, कटाक्षे उरात खंजिर घाली
आणि तत्क्षणी घाव चुंबुनी होई रंगरसेली

हासत, नाचत ये चंदेरी माझी गझल-कवाली
अन् रक्ताची मैफल उडवी हृदयी, रंगमहाली

दादर, २४·५·४१

## स्मृती

लोचनी ये आज पाणी त्वत्स्मृतीने साजणी,
भैरवी आलापिते ही रात्र येथे चांदणी

सूर ओथंबून कंठी कर्दळी भारावल्या
मुग्ध झाडांच्या तळी भांबावल्या या सावल्या

स्वैर एकाकी भ्रमे दिङ्मूढ वेडा काजवा
खिन्न झाला दोडकीच्या स्वप्नपुष्पांचा थवा

साचले पाणी इथे अन् त्यात गोठे चांदणे
आसवांच्या या जिण्याला मौज ना स्वप्नाविणे

योजने लंघून राहे स्वप्न माझे देखणे
सुस्मृतींची चालवीतो येथ मी पारायणे

या गवाक्षातून तू मी चंद्र होता देखिला
चुंबनाचा पाठ आम्ही त्याजला होता दिला

ओतिली त्याने तदा हर्षे सुधा सृष्टीवर
तीहुनीही गोड आम्ही वर्षिले सप्तस्वर

रात होता शांत सारी, गाल गालां लाविले
भोगिले ऐश्वर्य सारे स्पर्शसंगीतातले

मेघ वेगे पांगले अन् वायु झाला शीतळ
विश्वही झाले निळे अन् लोचनी आले जळ

आजही ये तेच पाणी दूर तू गे साजणी,
दूर तू, छे ! तू जिवाला राहसी आलिंगुनी

रात्र गाई भैरवी ही गोड वाटे सुस्वर
आणि अश्रूंतूनही हे दृश्य हो चेतोहर

९·९·४१

## रमणी आणि धरणी

प्रमत्त तुजपरि सखि ! ही धरणी
धीट देखणी तरणी ताठी
असल्या मादक सौंदर्याचा
मोह माझिया मना मराठी

हिचे तटतटे यौवन येथे
तुटू पहाती हिरव्या गाठी
तुझ्यापरी ही अधीर सजणे,
प्रखर माझिया स्पर्शासाठी !

चमके बघ कुदळीचे पाते
आहे ना मम अशीच दृष्टी ?
जी पडता तुजवरती वरिवरि
केलिस मजवर रतिसुखवृष्टी

नादि लागता तुझ्या म्हणाले
लोक कपाळी चढवुनि आठी,
' पोर फाकडी फिरवुनि याला
फेकिल जणु कळकाची काठी ! '

आजहि म्हणतिल, ' फोड काढुनी
घेइल अंती हाती माती ! '
लाखेसम या लाल मातिने
भरिन भांग तव माझ्या हाती !

या कुदळीच्या घावासरशी
चमक उठे बघ कशि सोन्याची
चमकुनि हटलो मागे जरि ती
हौस मला हिज लाजविण्याची

लाख सुखे मज दिसती दडली
या असल्या मस्तीच्या पोटी
म्हणुनी खणतो उन्हात असल्या
पितो चांदणे तुझिया ओठी

मी प्रीतीचा पाइक न सखे !
केवळ रतिसुखभोगासाठी
वा भूमीचा मालक केवळ
पोट कसे तरि भरण्यासाठी !

केपे, १५·९·४१

## हरिच्या स्मरभुवनी

सोड सखि ! येते काकुळती
कुंजवनीचे रव रात्रंदिन व्याकुळ मज करिती

आर्जवे करिशिल सांग किती ?
कळते मजला, दिसते सगळे; परि नच अन्य गती

दूर कर केशरची वाटी
चांदण्यात मी बुडवुनि काढिन अंगाची कांती

ललाटी माझ्या स्वैरपणा
आवळुनी हे केश बांधिता होइल काय उणा ?

रेशमी शालु नको चोळी
मधुचंद्रोदयि बसेन लेवुनि छायांची जाळी

रिते मज येथिल मणिमोती
दाटति आटति अश्रु चार पळ जैसे गणगोती

अमोलिक जरि ते तुज गमती
कालिंदीचे तुषार निळसर घे अंगावरती

नगांचे काढ झणी ओझे
या भाराने दुरावेल मज अंतिम घर माझे

जेधवा हृदयी धरिल हरी
सालंकृत तनुभागा मुकतिल परमामृतलहरी

घालिसी लोभ वृथा इथला
पाय सखे जरि रुतला, येथे प्राण तिथे रतला

वराया तनु येवो नवरा
भरोत अनलाने, लवणाने पितरांच्या नजरा

येथले पाश अता तुटले
देहसुखा जे भुलले जग त्या मन माझे विटले

भुले जो केवळ देहसुखा
स्पर्शे का तो शकेल उजळू हृदयातिल अलका ?

असा तुज काय रुचेल सखा ?
जीव हिरावुनि गेला त्याला म्हणशिल का परका ?

हिणव, म्हण अगणित त्या दयिता
अगणित सुमने फुलवि म्हणुनि का हीन गडे सविता ?

नको मज ठेवू गुंतवुनी
लग्नघटीने ठरेन जारिण क्रूर न हो सजणी

देइ सखि ! देई कान जरा
प्रवालपाशांपरि रव येती न्याया मजसि घरा

लाजरे जळ का तव नयनी ?
चल, पळ जाऊ, सखे ! विसावू हरिच्या स्मरभुवनी

केपे ४·११·४१

## जपानी रमलाची रात्र

तुझे विजेचे चांदपाखरू दीपराग गात
रचीत होते शयनमहाली निळी चांदरात
रतिरत कुक्कुटसा कुंडीवर आरोहुनि माड
चोच खुपसुनी फुलवित होता पंखांचे झाड
अद्भुत पंख्यापरि भिंतीवर आंदोलुनि छाया
लावित होती ताप जगाचा नकळत विसराया
धूप उसासत होता कोनी रजताच्या पात्री
विचित्र रेशिमचित्रे होती रसावली गात्री
तुझा पियानो यक्ष जळातिल होता निजलेला
मनात गुंफित स्पर्शसुखाच्या स्वप्नांचा झेला
अन् म्यूसेची कवने होती माझ्या हातांत
प्रतिचरणाला करीत होती धूम्रवेल साथ
जळत उसासत होते त्यांसह अंतरात काही
होता चिमणा श्वान लोकरी घोटाळत पायी
तोच वाजल्या तुझ्या सपाता सळसळला घोळ
आलिस मिरवित चालीमधुनी नागिणीचा डौल
करांतुनी तव खिदळत आले स्तनाकार पेले
जळता गंधक पाच उकळती यांहि रंगलेले
अभीष्ट चिंतुनि आम्ही त्यांचे भिडवियले काठ
सुरेहुनी तू गडे भाजिले ओठांनी ओठ
स्पर्शे तुझिया आणि पियानो थरारला सारा
मजसम त्याच्या कानशिलांच्या झणाणल्या तारा
गंधर्वांच्या दुहिता जमल्या करित पुष्पवृष्टि
हृदय मदाचे मोहोळ झाले जडावली दृष्टि

पोहु लागले तुझ्या रेशमी अलकांतिल मासे
हवा जाहली जड पाण्यासम अंगातिल वासे
आणि तरंगत डुलू लागली नौकेपरि शेज
तो कांतीतुन तुझ्या निथळले फेनाचे तेज
नखे लाखिया, दात मोतिया, वैदूर्यी नेत्र
अवयव गमले चपल चिवट की मयवनिचे वेत्र
कात सोडिल्या नागिणिचे ते नवयौवन होते
विळख्याविळख्यांतुनि आलापित ज्वालांची गीते
गरळ तनूतिल गोठुनि झाले अंतरात गोड
कळले का मज जडते देवा नरकाची ओढ
डोळे बांधुनि खेळत होते जीवन मायावी
अंधपणातच वितळत होते भूत आणि भावी
तुझ्या जपानी भाषा-लिपिसम अगम्य सुंदरता
असुनी हाती उरली दुर्लभ आली ना हाता

आजही तुज शोधिता कधी ती रमलाची रात
पाठीतुनि जंबिया मधाचा घालि काळजात !

२९·१०·४३

## स्पर्श

फुलल्या लाख कळ्या
स्पर्शसुगंधा घन अंधारी फुटल्या ग उकळ्या

ध्वनिकंपित तनुच्या शततंत्री
बंदी मन रतिमोहनमंत्री
लय लागुनिया नाचु लागल्या स्वप्नीच्या पुतळ्या

धूप जळे तिमिराचा पवनी
विनिद्रनयना व्याकुळ अवनी
पिकुनी लवल्या नक्षत्रांच्या द्राक्षलता पिवळ्या

भुई वाळुची संगमरवरी
तीवर काळ्या फेनिल लहरी
व्यथेतुनी सुख मंथित ग्रंथित झाल्या मधुर निळ्या

सुटल्या अवचित जटिल समस्या
फुटला रव स्मरकुटिल रहस्या
जननांतरिच्या स्मृतिंच्या ज्योति पाजळल्या सगळ्या

द्रवली नयने, स्रवली हृदये
दो चंद्रांच्या संगम उदये
दुणी पौर्णिमा, रसा न सीमा, उसळ्यांवर उसळ्या.

केपे, २७·१०·४५

# सोळा वर्षांनंतर

वर्षे सोळा झाली गोळा तुझिया डोळां भावमयी !
तयासवे आसवे तुझी ती पाझरली माझ्या हृदयी

झाकियल्या प्रणयार्ची लाली गालि तुझ्या सखि झळझळली
दाहे तिंचिया घर्मजले या भाळावरुनी ओघळली

संकल्पांचे घुमट वाटले मजला क्षणभर थरथरले
परी दृष्टितिल तुझ्या स्मिताने क्षणात ते सखि सावरले

" यश घेउनिया या लवलाही ! " वदलिस अस्फुट काहि असे
गमले मजला जीवन सारे नटले पुनरपि वीररसे

रमे ! यापुढे उमा मला तू दिव्य मंत्रसे शब्द तुझे
स्मरता त्यांते लोचन माझे कडकडत्या भिडतात विजे

मिटता ते अन् गळता गात्रे हृदय गडे अवचित उघडे
आणि अश्रुंचे तुझ्या मंगले ! मौक्तिकदर्शन मजसि घडे

निजकांतीने सांत्वन करिती विरघळतो जेव्हा विरही
अन् ताऱ्यांपरि पथ दावुनिया सावरिती लढता प्रलयी

मुंबई, २८·७·४६

## खंजीर हे मारीत जा!

उद्धटां ऐटीत या खंजीर हे मारीत जा
लाळघोट्या लोचटांना अन् खडे चारीत जा
खंजीर हे मारीत जा

अलुडे, चोहीकडे जा हुंदडोनी केवडे
कवंती झाडीत ही गर्दी दुरी सारीत जा
खंजीर हे मारीत जा

वीजशी तेजाळुनी अभ्रे भ्रमाची जाळुनी
स्वर्गवेड्या लोचनांची व्यग्रता वारीत जा
खंजीर हे मारीत जा

विक्रमा दे प्रेरणा, आव्हान दे गे यौवना
काष्ठपाषाणांतुनी चैतन्य संचारीत जा
खंजीर हे मारीत जा

पंचभूतांच्या परी नाना विलासी फाकुनी
आधिव्याधी अन् जरामृत्यूस संहारीत जा
खंजीर हे मारीत जा

देवदैत्यां जागवी अन् मांड गे हृन्मंथना
कोष रत्नांचे झणी तारीत उद्धारीत जा
खंजीर हे मारीत जा

मुक्त मी संजीवनी ! विश्रांतिची हो रागिणी
आणि माझ्या अंतरीची तार झंकारीत जा
खंजीर हे मारीत जा

मुंबई, ६·२·४७

# माझ्यापरी

अंतरी माझ्यापरी गे मुक्त तू, संन्यस्त तू
जीवनी माझ्यापरी संयुक्त तू, बंदिस्त तू

वृत्तिने माझ्यापरी स्नेहाळ तू, स्वच्छंद तू
मुक्त हस्ते वाटिसी माझ्यापरी आनंद तू

घालिसी माझ्यापरी नाना मिषे गे वाद तू
हासुनी माझ्यापरी अन् आणिसी संवाद तू

वाणिने माझ्यापरी गे लाघवी अन् गोड तू
वर्तने माझ्यापरी गे लाविसी अन् ओढ तू

संयमे माझ्यापरी गे निर्मिसी सौंदर्य तू
आणि त्याने संयमाला आणिसी माधुर्य तू

वारिसी माझ्यापरी अन् जीवनीचे द्वैत तू
भावनांचे साधिसी माझ्यापरी अद्वैत तू

होमुनि माझ्यापरी होसी जगाचे दिव्य तू
होउनी माझ्यापरी गासी विधीचे काव्य तू

मुंबई, २९·९·४७

# डोळे तुझे बदामी

डोळे तुझे बदामी देती मला सलामी
त्यानेच हा असा मी झालो गडे निकामी

लागे न चित्त धामी लागे न चित्त कामी
मोठे लबाड लुच्चे डोळे तुझे बदामी

जखमी करून जीवा हसती वरून नामी
भरितात मीठ ऐसे डोळे तुझे बदामी

बोली मिठास त्यांची कावा तरी गनीमी
भुलवून मारणारे डोळे तुझे बदामी

होती क्षणात भोळे होती क्षणी वहीमी
छळिती परोपरींनी डोळे तुझे बदामी

जरि हाल चालती हे दे नित्य ही गुलामी
सुल्तान मोंगली हे डोळे तुझे बदामी

मी धुंद मोर कामी फुलवून रोमरोमी
हे नाटकी इमानी डोळे तुझे बदामी

मुंबई, २९·९·४७

## तव नयनाचे दल हलले ग

तव नयनाचे दल हलले ग !
पानावरच्या दंवबिंदूपरि
त्रिभुवन हे डळमळले ग !

तारे गळले, वारे ढळले
दिग्गज पंचाननसे वळले
गिरि ढासळले, सुर कोसळले
ऋषि, मुनि, योगी चळले ग !

ऋतुचक्राचे आस उडाले
आकाशातुनि शब्द निघाले
" आवर आवर अपुले भाले
मीन जळी तळमळले ग ! "

हृदयी माझ्या चकमक झडली
नजर तुझी धरणीला जडली
दो हृदयांची किमया घडली
पुनरपि जग सावरले ग !

मुंबई, २८·११·४७

# खाईतला स्वर्ग

मखमली या अंतरी तू नेत्ररत्ने खोविली
ती निखाऱ्यांसारखी पेटावयाला लागली

तू गडे अंगा, रुमाला लाविला जो केवडा
त्यातुनी फुत्कारती गे लक्ष नागांच्या फडा

थंड तू पाणी जुईचे जे दिले चांदीतुनी
मस्तकी त्याचीच झाली मस्त वेडी वारुणी

गार तू हस्तांबुजांनी गाल हे गोंजारिले
गंधकाचे चूर्ण आता त्यातुनी वाटे जळे

घालिता तांबूल तोंडी बोट हे तू दंशिले
आज त्याच्या गे विषाने स्वास्थ्य सारे भ्रंशिले

बाहुंची नी पुष्पमाला जी गळा तू घातली
घात घाली तीच आता तात जीवा वाटली

आणि तू जी पुष्पमुद्रा ठेविली ओठांवरी
तप्तमुद्रा होउनी ती डाग देई अंतरी

जाणसी तू शेज का ही अग्निशय्या जाहली
रेखिसी जी आज स्वप्ने काल मी ती पाहिली

राहुनी खाईत या मी स्वर्ग येथे पाहतो
कालकूटी पोहताही अमृताने नाहतो

मुंबई, २९·२·४८

## रुमडाला सुम आले ग

तुला मला उमगला जिव्हाळा
जन्मांचा पट फिटला ग
अन् शब्दांचा प्रपंच सगळा
कमळांसम हा मिटला ग

तुला पहाता पहाट वाटे
ओती कुरणी मोती ग
प्रभेस मिळती कृतार्थ होती
अभिलाषांच्या ज्योती ग

देखियल्याविण तव तनु मजला
बाग फुलांची उघडी ग
खुडिल्याविण त्यां मन्मन झाले
अन् सोन्याची परडी ग

मन तव चंद्रापरि करि सोबत
जेथे संचित नेते ग
चराचरातुन प्रेमळपण तव
हासत जवळी येते ग

तुझ्या लोचनी पावन सरिता
क्रांती आणिक शांती ग
मदन अंतरी जळला, पडल्या
अस्थी प्रयागतीर्थी ग

आलिंगन-चुंबनाविना हे
मीलन अपुले झाले ग
पहा, पहा, परसात हरीच्या
रुमडाला सुम आले ग

मुंबई, २१ २·४८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५७१३
दा. क्र. २८४५०
२५।१७।५८
शाखा (स्थळ प्रत)

## खिडक्यांवर वाजे वारा

खिडक्यांवर वाजे वारा ग
चल उघड सुंदरी दारा

रस्त्यात धुळीचे भवरे
नभ क्षणात झाले गहिरे
रवि ठिबके होउनि पारा ग

खोडांतुनि फुटले भास
दगडांतुनि सुटले श्वास
रजताच्या झडल्या धारा ग

सांभाळित अंचल-ओचे
उघडले दैव कोणाचे ?
निर्वेध वेचु या गारा ग

करु मुखात त्यांचे पाणी
आकळू ऋतू गात्रांनी
दो क्षणांत निववु सहारा ग

उच्छृंखल यौवन नाचे
भय सरे जरामरणाचे
ये बहर पुन्हा शृंगारा ग

मातीतुनि खिदळे पाणी
पाण्यातुनि फुटती गाणी
गाण्यांत हिरवळे चारा ग

प्राणात नवीनच ज्योती
पावळीत झालरमोती
नवतोरण घरसंसारा ग

पुणे, १०·७·५०

# आज तुझ्या घरि आल्ये

आज तुझ्या घरि आल्ये

लाज जगाची सख्या तुझ्यास्तव कोळुनिया मी प्याल्ये
सोडुनि सासर, सोडुनिया घर, तोडुनि पाश निघाल्ये

लाथाडुन धन आल्ये धावुन, सांडुनि पोरेबाळे
घरबुडवी मी, कुळबुडवी मी, माझे दैव निराळे

तू रिघता उरि, पाय नुरे घरि, सौख्यच होय विखाळे
सुटली ही तड, दूर तीहि कड, नदी मधेच उमाळे

खुशाल दे दडि, मी दिधली उडि, सावर वा कर काळे
पणास लावुन तुझे थोरपण थोर तुझ्याहुन झाल्ये

पुणे, ६·१०·५०

## मी नंदाघरची बावडि ग

नंदाघरची बावडि ग, मी नंदाघरची बावडि ग
दिसुनी क्षणभर श्याम मनोहर त्यासम झाल्ये लालडि ग

अष्टांगांनी पाझरल्ये मी
व्योमीचे रस आले रोमी
मातीमधुनी स्रवुनी साखर झाल्ये वेडी भावडि ग

गाय पाडसाविण पान्हेली
तशी भरूनहि मी तान्हेली
तुमच्या जलभरणाविण तृष्णा गोड असुनिही कोरडि ग

घाली रवि सोन्याची लेणी
चंद्र विणी मोत्यांनी वेणी
लावी उटणी पवन तरीही न पुरे माझी आवडि ग

घेण्यातिल सुख कळले बाई !
देण्यातिल : त्या मितीच नाही ! !
तुमच्या कलशासंगे भरती माझ्या जीवन-कावडि ग

घट तुमचे ते रिघता पोटी
दुवा सुखे पुटपुटल्ये ओठी
प्रीतीची गत अशीच उलटी आणिक बोली बोबडि ग

करुनी करुणा पुरवा तृष्णा
मिळवा तुमच्या उरिच्या कृष्णा
कुब्जेपरि होईन उजू, जरि आठ ठिकाणी वाकडि ग

युगायुगांची मी ग गोपी
पडल्ये सापडल्ये या कूपी
कुंजवनातिल तृणातृणाशी घाला माझी सांगडि ग

पुणे, ११-१-५१

## पागल हो क्षण

किती किती राहशील सावध ?....मोडशील ग भाराने
उडते छप्पर धरिले का कधि हटेल मिटल्या दाराने ?
पागल वारा, पागल धारा, खेळ मांडिला पाण्याने
सावरशिल किति करिची पणती वारेभरल्या पदराने ?
धडकन अंधारात विजेची !....अगत्य का ग वातीचे ?
घालशील किती आवर प्राणा ?—शरीर हे तर मातीचे
इथल्या रेघा पाडिति भेगा; ये उघड्यावर उघड्याने
घडी अशी ही पागल येते क्वचित कधीतरि भाग्याने
तोडुनि बंधन, पागल हो क्षण, वाग जरा अविचाराने
खुज्या जगाला खुशाल म्हणु दे, "झपाटली हिज जाराने !"

पुणे, १९-५-५१

# पावले धारेच्याही पुढे

ओलांडुनि साकडे पावले धारेच्याही पुढे

सहज कराया गेले क्रीडा
तोच जळाचा आला वेढा
निरीस ओढित गेला वेडा भडकत भलतीकडे
पावले धारेच्याही पुढे

तयास सखये गेले जिंकू
नेले त्याने काजळ-कुंकू
खरे कशाला आता झाकू ? नुरले लुगडे, चुडे
पावले धारेच्याही पुढे

लज्जा भीती आता फिटली
पाठीमागिल ममता मिटली
नवी नव्हाळी अंगी नटली उरी पाखरू उडे
पावले धारेच्याही पुढे

येथिल ऊन परांची दुलई
जळास इंद्रमण्यांची झिलई
पवनी गंधर्वांची सनई, हवेत अमृतसडे
पावले धारेच्याही पुढे

नकोस डोळां आणू आसू
हसेल त्याला दे गे हासू
नको धपापू नको उसासू कोंडुनि पोटी रडे
पावले धारेच्याही पुढे

पाण्यातिल गे प्रीत निराळी
जिच्या एकदा आली भाळी
ती नच परते गे कधि काळी सुटल्या भूमीकडे
पावले धारेच्याही पुढे

एक काम कर सखये ! माझे
तुला जरि न हे वाटे ओझे
घेउनि जा घरि तुझ्याजवळ जे घासुनि भरले घडे
पावले धारेच्याही पुढे

पुणे, १७·९·५१

## श्यामा

तू शरत्कथेतिल अमललोचना श्यामा
प्राजक्तमानसा मृदुगंधा अभिरामा
अष्टादश फुलवित पुलकी प्रणयपुराणे
या आलिस माझ्या वयस्क आश्रमधामा

तू आलिस पेलित अंगी वेल विजेची
अधरांवर झेलित अमृतकोर बिजेची
घन कुटिल कुंतली गुंतवुनी स्मरसेना
पापण्यांतुनी अन् सिंचित धुंद निजेची

श्रमलीस इथे कधि दक्ष होउनी शिष्या
छेडिलेस कधि मज ताणुनि कृष्णधनुष्या
वटतळी कधी तर कधी जळाच्या काठी
गाउनी मांडलिस माझी सत्त्वपरीक्षा

दो प्रहरी आली घडी तुझी जायाची
वाटले परतली थंड झुळुक वाऱ्याची
वाजली शिटी अन् मी वदलो काहीसे
तो डोळ्यांतुनि तव झडली सर मोत्यांची

कर फिरवित शिरि तव म्हटले मी तुज ' वेडी '
तो कळीत फुलली तुझ्या फुलाची गोडी
किति वेळ लोचनांसमोर उरले रूळ
पावलांत पडली त्यांहुनिही जड बेडी

त्या क्षणे आजपरि तरारले कडुनिंब
या साकळल्या जळि थरथरले विधुबिंब
भिंतीवर श्यामल लसलसल्या दलवेली
अन् हिरवळ झाली दवात ओलीचिंब

महाबळेश्वर, ८.५.५२

## डाळिंबीची डहाळिशी

डाळिंबीची डहाळिशी नको वाऱ्यासवे झुलू
सदाफुलीच्या थाटात नको सांजवेळी फुलू

मऊ शुभ्र जांभापरी नको गुलालात रुसू
सोनकेतकीशी नको कुशी उसवीत हसू

बोलताना लाटेपरी नको मोतियांनी फुटू
सावल्यांच्या पावलांनी नको चांदण्यात भेटू

नको चाफ्याच्या श्वासांनी संगे चालत लगटू
गर्द झाडीत विजेचे नको लाघव प्रगटू

नको घुसळू पाण्यात खडीसाखरेचे पाय
नको गोठवू ओठात दाट अमृताची साय

नको वितळते लावू डोळे एकांताच्या पारी
उसासून धपापून नको होऊ गोरीमोरी

नको सावरून पुसू जुन्या कवितांचे मूळ
नको उकरून काढू पुन्हा सोन्याचे ते सूळ

नको फळत्या वयात घेऊ संयमाचे माप
वर दिलास तयाचा नको करू अभिशाप

६·९·५२

## अजब आगळी

कितिक भेटल्या हिर्चा परंतु अजब आगळी तऱ्हा नवीन
ओठांतुनिही नटेल डोळे छटेल भाषेमधे प्रवीण

नसे भरवसा कशा मिषाने हसून पाडिल फशी कुणास
कधी अकारण करून गहजब रुसून लाविल जिवास फास

होकाराची हिच्या न खातर हमेश कातर धरा जमेस
धीरधिटाई असेल तर मग तशीच वाणहि नसे क्षमेस

नकारातहि प्रकार अगणित नित्य जागवी नवे विकार
चुकार शब्दांतुनी परंतू सवेच विझवी आग विखार

पाण्यापरी ही अवखळ चंचळ क्षणक्षणाला नवीन रंग
कधी निथळती, कधी बिथरती हिचे सावळेनिळे तरंग

असे तरी ती तशीच निर्मळ कधि न मावळे हिचा प्रसाद
कसेहि जग बोलले तरी तिज नसे तयाचा खंत-विषाद

जळपूजक मी बसुनि सांजचा जळी पूजितो तिचेच रूप
काळोखाच्या तशा निवांती मनात माझ्या जळतो धूप

अशा घडीला येउन मागुन गळ्यात ही मम घाली हात
वळुनी बघता दिसे लोचनीं पाण्यातहि जळते फुलवात

१९५३

# मृदुमद्गति ती येते जेव्हा

मृदुमद्गति ती येते जेव्हा
निनादवित निज सजल पैंजणे
दहिवर ध्वनिचे पारदकांती
मलईसम अति गार मुलायम
विलयलयीची फुलवित वलये
विरघळवी धुंदीतच गहिऱ्या
अचरचरांच्या कायिक रेखा
आणि तयांच्या जळछायांसम
तरल विकंपित नवदलदेही
उमलुनि काही, विरल विदेही
स्पंदु लागती कणाकणांतुन
मूक क्षणांतिल छंद तराणे
गिरि अंतर्हित मंत्र गिरेने
लाटांसम ओलावत झुलती
तरुशाखांतुन वैशाखाची
कुसुमित होती काष्ठतरंगे
दगडांतुनि द्रुतगति पाण्याची
दिडदिडते मकराकृति वीणा
घुमती वंशवनातुनि वंशी
धुंद मृदंगी गंध-मृदंगे
अन् स्पर्शाच्या मलयवल्लरी
हर्षाच्या अमृतलहरींतुन
मुक्ताफळसम उधळित जाती
गंधर्वांच्या शत मिथुनांच्या
प्रणयार्कातिल फेन-फवारे

एकार्णवि या स्वरवलयांच्या
तलगत गात्रे समेत बुडती
स्फटिकांची होउनिया पात्रे
मृदुमदगति ती येते जेव्हा...

मृदुमदगति ती येते जेव्हा
वितरित हिमकिमयेची फुंकर
अमरवनातिल अमल लता नव
अति चेतनगंधा अन् अमली
गाळित निज अलकोपम मोहर
मंद मधाच्या पर्जन्यापरि
चराचरि भरितात उन्मनी
आणिक नंतर
मंतरल्यापरि मंथर वारे
वळिती निज अलसाकुल अंगे
देती गिरिदरि संथ जांभया
जांभळणाऱ्या हिरव्या राया
हलके हलके मिटीत पलके
छाया होउनि डुलक्या घेती
नशा दिशांना चढत निशेची
परस्परां त्या बिलगत कलती
झुलतझुलत अन् आकाशाचा
रसभाराने लवतो मांडव :

अंधाराच्या त्याच्यावरल्या
लवलवत्या ओलेत्या वेली
हसती, कधि मुसमुसुनि स्फुंदती
नावरुनी मधुभाव तयांना
यौवन-उन्मद लावण्याचे
द्युतिबिंदू होउनि टपटपती

त्या तालावर वितल तलातल
फुलत राहते, झुलत राहते
मृदुमदगति ती येते जेव्हा...

१९५४

## कामद्रुमाची डहाळी

कामद्रुमाची डहाळी आज एकाएकी न्हाली
झोपावला माझा रावा झेपावला अंतराळी

याच डहाळीखालती झाले उन्हाचे चांदणे
आणि छायेने प्रकाशा तिढे घातले उखाणे

उष्टी घोळविता बोरे रामा उमगली सीता
भोळ्या मिठीत राधेच्या कृष्णा गवसली गीता

सुजातेची खीर येथे झाली मुक्तीहून गोड
बोधिसत्त्वाची फळली पूर्वसुकृतांची जोड

माग्दालीनेच्या पूजेने ख्रिस्त येथे झाला होता
सुळी जाण्याच्या पूर्वीच सुखे मरूनिया जिता

क्रौंच पक्ष्याच्या रक्ताने हीच डहाळी भिजली
फळ हिचेच चाखून ईव्ह आपाद लाजली

घामा-रक्ता-आसवांचे हिच्या मुळा झाले आळे
आज अचानक तिला फळ अळुवार आले

रावा आकाश पिऊन आला, निळा निळा झाला
फळ चाखता चाखता स्निग्ध प्रकाशात न्हाला

" रती असून मी सती " बोले हेलावत फांदी
माझ्या शुकाच्या मुखात नवी ओलावते नांदी

१३·९·५७

## हीच हीच ती सागरवेला

आठवते का?
हीच हीच ती सागरवेला
अशीच होती अर्धी भिजली
हळद उन्हाची लावुनि अंगा
चोळित अन् चंद्राचे उटणे
आणि त्या तिथे
महाकाय अन् काळ्या काळ्या
होडीच्या एका कानावर
भिकबाळीशी झुलत झुलत तू
ओठावरती ठेवित होतिस
चंद्रकोरशी पातळ नाजुक
शहाळ्याच्या मलईची शीतल
निळसर नवथर फाक कोवळी

तशी तुला निरखून तेधवा
दिशा अवंढे गिळित्या झाल्या
अधिकच फुटल्या जिभा समुद्रा
वाळूचीही झाली साखर
त्या तसल्या साखरवेळेला
खरोखरच का खाकरलो मी?
असेल!
वय ते तसेच असते
प्राक्तन अपुले माहित नसता
सहजच ते त्या जाऊन भिडते

म्हणुनच नच का
नजर तुझी ती पाकोळीशी लहरी चंचल
असुनहि ठरली स्थिर माझ्यावर ?
आठवणींचे दुवे सांडले
कधि काळी जे चार ठिकाणी
क्षणी कसे ते गुंफुनिया तू
समूर्त केलिस अमूर्त ओळख ?

कवण जाण ती
जिच्यामुळे तू बळे बळे ओढीतच मजला
होडीवरती गेलिस घेउन ?
—आणि विनंती, नंतर आग्रह,
तो सरल्यावर हट्ट नि रुसवा
असे निरागस खेळ करित तू
भरविलेस मज पुरे शहाळे
आणि मीहि खुळचटाप्रमाणे
खात राहिलो तुला न देता !
आणिक तरिही मला न कळता
देउन बसलो सगळे काही

हर्षे मग तू मला म्हणालिस
" बसू गोल त्या ढगासारख्या
फुरशासम वेलींनी भरल्या
नरम वाळुच्या थिव्या ढिगावर
माडांच्या झावळ छायांनी
जया घातले कोमल कुंपण. "
मुकाट मी मग मंतरल्यागत
तुझ्यासंगती बसलो तेथे
तूच तेवढी बोलत होतिस

स्मरे न त्यातिल शब्द एकही
अजून स्मरते परी खडक हा
पाण्याच्या होऊन गुदगुल्या
कसा शहारत हासत सुटला
आणि असा हासता हासता
कसा सुखे घामाघुम झाला !
अजून स्मरते त्या माडांच्या पात्यांवरुनी
पाणी होउन कसे झिरपले
' शेवा ' गेल्या भंडाऱ्याचे
कुणबाऊ प्रीतीचे गाणे....
अजून स्मरते वाळुतिल बोटांत माझिया
पडली कोमल कशी जोडवी
आणि तत्क्षणी कसे अचानक
होउनिया कापूरबाहुल्या
पेटुन आपण झालो ज्योती
——चंद्रज्योति सुखसौगंधाच्या
आणि कशा कायांच्या छाया
स्वस्तिक करुनी झाल्या अक्षर
होउनिया अशरीर तेधवा
कृष्ण मर्मरी कोरियले ते
चांदण्यातले अनुपम लेणे
अहा रेखिले अनुपम आपण !
वाळूवरचे सगळे काही पुसून जाते
म्हणोत कितिही लाख शहाणे
त्या डोळ्यांनी पुन्हा पहा सखि
अजुन चित्र ते तसेच दिसते
त्या ज्योतींचा गंध तरळतो

पुणे, २७·१०·५७

## अ प रि चि ते

अपरिचिते ! तू चिरपरिचितशी परोपरी मज भाससि का ?
गालि जिभेचा धरुनि आवळा डोळ्यांनिच अशि हाससि का ?

' बसी ' त दिससी कधि रुसल्यागत अधर काढुनी पुढे जरा
अन् झटक्याने उडवित जाशी तुरगपुच्छसा अलकतुरा
लगेच पण तू थांबुन क्षणभर दुखावल्यागत पाहसि का ?

आवडिचे मम ठावठिकाणे अचूक ठाऊक तुला कसे ?
जळात तारे मोजायाचे तुलाहि जडले कसे पिसे ?
तरिहि लागता माझी चाहुल निळीत पाहत राहसि का ?

ठेच लागली वळणावरती होतिस तेव्हा तूच कडे :
घाट घालुनी तूच काय हा इथे पसरिले असे खडे ?
आणि ' आइ ग ऽ ' किंचाळुनि वर बोट आपुले चाविसि का ?

अपरिचयी परिचय व्हरावा हीच तुझीही काय तऱ्हा ?
धडा घेउनि जवळ असुनही बळेच राहुन दूर जरा
चंद्र उगवता उरात माझ्या करांत त्याच्या नाहसि का ?

पुणे, ११·९·५८

# विरले सगळे सूर

विरले सगळे सूर तरी ही उत्तर-रात्र सुरेल
ओसरल्यावर आपण सजणे अशीच ओल उरेल

श्वास आपुला वास होउनी हवेत या तरळेल
ध्यास आपुला भास होउनि तमात या उजळेल

गीत आपुले शीळ होउनी या माडांत घुमेल
प्रीत आपुली वेल होउनी या वाळूत रुजेल

सरेल अपुली वाट तिथे ही अशीच लाट फुटेल
पहाट होता स्वप्न आपुले फुलांत ओलावेल

पुणे, १४·९·५८

## मंद असावे जरा चांदणे

मंद असावे जरा चांदणे, कुंद असावी हवा जराशी
गर्द कुंतली तुझ्या खुलाव्या शुभ्र फुलांच्या धुंद मिराशी

दूर घुमावा तमात पावा, जवळच व्याकुळ व्हावे पाणी
तहि कथावी रुसुन अकारण सासू-नणदांची गाऱ्हाणी

सांगावे तू दुःख आगळे माझ्यासाठी गिळिले कैसे
आणि आंधळ्या भलेपणी मी तुला केधवा छळिले कैसे

उदासता अन् सुखात, कोठे कौलारावर धूर दिसावा
असे निसटते बघून काही विषाद व्हावा जिवा विसावा

मंद असावे जरा चांदणे, कुंद असावी हवा जराशी
करुणाभरल्या मुकाटपणि अन् तुला धरावे जरा उराशी

६·४·६०

## असा कसा मी तरुण निरंतर

असा कसा मी तरुण निरंतर सांगू कैसे तुला
सहज अचानक झाकुन डोळे तिने चुंबिले मला

थिजलो, बुजलो, पळतच आलो खाली वर्गामधे
खुडित ज्योतिची फुले पोचलो परंतु स्वर्गामधे
तेथे न्हाणुनि सुरांगनांची केली अमृत-तुला
जेव्हा ऐसे सहज लीलया तिने चुंबिले मला

त्या रात्रीचे तसे चांदणे जगी न पडले कधी
तशी न उरली पुन्हा कधीही दुथडी जागी नदी
उरात घुसुनी गळ्यात घुमली निळी निळी कोकिळा
असे झाकुनी डोळे जेव्हा तिने चुंबिले मला

आज मावळे जरी चांदणे, आटत आली नदी
तीच कोकिळा कधितरि येते घुंगुर बांधुन पदी
गाता ती मग उघडे गात्री कुबेरगृहिंची 'तिळा'
तरुण असा मी, जेव्हापासुन तिने चुंबिले मला

७·४·६०

## घनसगर्भ नजर एक

घनसगर्भ नजर एक, स्मित सूचक फुलणारे
संकेतक वाक्य एक विविधार्थे छळणारे

दे अथवा विद्युद्वत स्पर्श जरा ओझरता
त्याविण सखि खिन्न जिणे दिवस सुन्न व्यर्थ रिता

ये नेसुन वसन धवल, माळुन ये धवल फुले
भाळावर खेळवीत नवलाचे स्वप्न निळे

उजळ उजळ कांतिरसे सांध्यगूढ श्यामलता
फुलव मधुर कुटिल वचे प्रतिभेची पुष्पलता

दूरातुन पण रात्री निःश्वासित गुज अधुरे
गाळित ये हृत्पात्री तिमिराचे विष गहिरे

अन् भिडता क्षितिजाला ज्वालांतुन मूक व्यथा
एकाकीपणि तसल्या ज्योत्स्नारति हो कविता

१६·६·६०

## मंदावता सगळी उन्हे

मंदावता सगळी उन्हे आलीस का उशिरा अशी ?
थंडावता जळुनी वने झडलीस का सर गारशी ?

शृंगारला स्वप्ने झुला केव्हाच तो गे वाळला
सरता वसंत असा उरी झंकारशी का तारशी ?

आल्या घडी वळल्या सुन्या पेल्यांस अन् गेले तडे
तरि त्यात का धुंदावुनी ओसंडशी मधु-धारशी ?

सुकता दळे कमळे जळे झुकता निराशुन चांदणे
प्रतिभेतले हुकले जिणे का वास्तवी आकारशी ?

जे जे मिळाले जीवनी उशिराच ते आले असे
छळलाट ही हृदयातली सखि तूही का ग उभारशी

तुजसाठि जे जे जोडिले वैतागुनी लाथाडिले
पथ पाहुनी थकल्या जिवा भिडलीस का तलवारशी ?

रुधिरात या स्वरवाहत्या जरि उर्वशीशी बिंबशी
म्हणणार मी न तरी पुन्हा आलीस का उशिरा अशी

१७·६·६०

# सरिंवर सरी आल्या ग

सरिंवर सरी आल्या ग
सचैल गोपी न्हाल्या ग
गोपी झाल्या भिजून चिंब
थरथर कापति निंब-कदंब
घनांमनांतुन टाळ-मृदंग
तनूंत वाजवि चाळ अनंग
पाने पिटिती टाळ्या ग
सरिंवर सरी आल्या ग

मल्हाराची जळात धून
वीज नाचते अधुनमधून
वनात गेला मोर भिजून
गोपी खिळल्या पदि थिजून
घुमतो पावा सांग कुठून ?
कृष्ण कसा उमटे न अजून
वेली ऋतुमति झाल्या ग
सरिंवर सरी आल्या ग

हंबर अंबर वारा ग
गोपि दुधाच्या धारा ग
दुधात गोकुळ जाय बुडून
अजून आहे कृष्ण दडून
मी-तू-पण सारे विसरून
आपणही जाऊ मिसळून

सरिंवर सरी आल्या ग
दुधात न्हाणुनि धाल्या ग
सरिंवर सरी : सरिंवर सरी...

२४·६ ६०

# तुला पहावे

तुला पहावे कधि भिजताना
कधि अथवा पुरती भिजलेली
नजर जाउनी माझ्यावरती
क्षणभर लज्जेने थिजलेली

तुला पहावे कधि एकान्ती
उदी मुक्त कच विंचरताना
अन्यमनस्कपणे अपुल्याशी
अरळ ओळ मम गुणगुणताना

तुला पहावे कधि मेजाशी
रेखित असता व्यथा कथेतुन
मंद निळ्या विद्युद्दीप्तीने
रेघ मुखाची निघता उजळुन

तुला पहावे उन्हात केव्हा
वेगवतीवरुनी वळताना
कटाक्ष सूचक टाकुनि मजवर
उडत्या कुसुमासम हसताना

तुला पहावे काव्य परिसता
चकित विकल कधि सभय बावरी
अधिर व्हावया माझ्या मुखिची
अक्षय-मधुची नवलपावरी

तुला पहावे छायानर्तनि
कधि स्वप्नांनी थरथरताना
झुकुनि वेलशी खांद्यावरती
अधराने मज मंतरताना

३·७·६०

# तुझ्यामुळे

खडीसाखरेचा खडा जीव झाला तुझ्यामुळे
खिरे विरे पळ पळ तुझ्या प्रीतीच्या ग जळे
आता गोडावे वासना दुजे न ये काही मना
रूप चालले लयाला तुझ्या भाळुनिया गुणा
म्हणे मिठाचा बाहुला सिंधु-ठाव पाहू गेला
त्याच्या ऐश्वर्याची आली माझ्या जीवनास कळा
तुझ्यातही नाही आता कुठे शिरावया रीघ
आहे नसून तुझ्यात तुझ्यामुळे शिगोशीग

१८·७·६०

# आज पहाटे

आज पहाटे निष्पाप पापण्यांवर
उमलत असताना सोनेरी जाग
तुझी सानुराग अंगुळे खेळवीत होती
माझ्या थकल्या अलकांतून एक मुलतानी राग
अनावर निःश्वासांतून ठिबकत होते गालांवर
सुगंध-शीतळ पुष्पराग
खरेच तू कुजबुजली होतीस,
“ या घटकेला वाटेल ते माग. ”

लडिवाळपणाने लगडत रचलीस अंगावर
तिशीच्या लुसलुशीत उश्यांची मखमली गर्दी
अर्धतंद्रावस्थेत राहिलो कुरवाळीत
एक रेशमी अभ्र्याची मत्तोन्नत गिर्दी
रंभोरूच्या अनावृत स्पर्शातून
देत होतीस जलतरंगाच्या नांदीची वर्दी
वाटले मी केवळ स्वरांचा पागल
तूच या तरल संगीतातली खरी दर्दी

राजहंसीच्या राजस सहजतेने
गळ्यात गुंतवीत ओवळ-सराची मान
डाळिंबाच्या उदकाळ ओठांनी
भरवलेस मला माझेच मुकलेले प्राण
माधुर्याची शीग होऊन नकळतच
गळला उरात रुतलेला तृष्णेचा बाण
तजेल्याच्या नद्या उतून
उजाडल्याचे झाले भान

गुलाबी धुके वितळून गेले
सर्वत्र तरीही तुझाच भास
पाचोळ्यातहि ओलाचिंब
तुझाच वास, तुझाच श्वास

६·७·६०

## जवळ जवळ असुन रोज

जवळ जवळ असुन रोज का जपून दूर तू?
का थरारल्यावरीहि चोरितेस सूर तू?

तार तार वाजुनी सतार आर्त बावरी
मौन दाटले घनांत सावरी स्वरांवरी
का सरी उसासताहि उघडिसी न ऊर तू?

बिंबल्या निळ्या जळात स्वप्नराजि लाजऱ्या
सांजसावल्यांत गाढ चांदफेनमंजिऱ्या
का न आणिसी टिपूर चांदण्यास पूर तू?

जागवून यौवनास आग लाविली वना
नाग चेतवून का ग डंखिलेस चंदना?
हसुन मधुर का निठूर प्राक्तना फितूर तू?

बघत वन्हि चांदण्यात, सांत्वनेत यातना
स्वगत गात, आर्जवीत कामनेत प्रार्थना
राहशील गे किती युगे अशी सबूर तू?

पुणे, २१·२·६१

## ती एक याद

सळसळ लाटा क्षाळिति काठा, वाळूवरही फेनतुरे
साद नसो पडसाद नसो : ती एक याद पण आज पुरे

अशीच होती धुंद वेळ ती : गंधकोवळी सांद्र हवा
गडाजवळच्या वडाआडुनी होता उगवत चंद्र नवा
पुढे विचंचळ होते पाणी, अंचळही तव जवळ तसा
उरिचा वाळा उसवत आला वासंतिक स्मरमोहरसा
छंदतराणा घुमला पोटी, ओठी अमृत तटतटले
निकट ओढुनी जरा तुला मी गीत लाडके म्हण म्हटले
ग्रंथ लावुनी उभय उरोजां सभय बाजुला सरलिस तू
रुसलिस अन् पण चिडता मी गे त्या वळणावर अडलिस तू

बघत भोवती भेदरल्यागत कधी मजकडे कधी नभी
अवचित ओठी टिपुन घेतलिस धुक्यातली मम पुसट छबी
धुकेच झाले अवतीभवती : त्यात चांदणे विरघळले
ग्रंथासह कधि मावळलिस तू अजून ते मज नच कळले

आजहि तरते क्षण-अत्तर ते चंद्रबिंबही जळि उतरे
साद नसो पडसाद नसो : ती एक याद पण आज पुरे

मुंबई, २२·३·६१

## तू रहा अशीच दूर

तू रहा अशीच दूर; मी भरून ऊर
एकलाच आळवीन जो दिलास सूर

लौकिकातल्या सुखी सुने, उदास वाटता
आणि आसवे उगीच पापण्यांत दाटता
मी असेन जेधवा मलाच शोधण्यात चूर
एकलाच आळवीन जो दिलास सूर

आटता तळी, झरे, घळीत पेटता झळा
पोळुनी उसासता मुकाट माळ मोकळा
जीव जेधवा भ्रमेल भ्रांत होउनी चतूर
एकलाच आळवीन जो दिलास सूर

दीस जेधवा पडेल पालथा जसा घडा
पिंपळापलीकडून अन् झडेल चौघडा
जांभळ्या घरांवरून कोवळा चढेल धूर
एकलाच आळवीन जो दिलास सूर

पुणे, २२·५·६१

## मातीमधि मुरल्याविण

मातीमधि मुरल्याविण चव नाही पाण्याला
विरहाने झुरल्याविण द्रव नाही गाण्याला
शरिराच्या तृष्णेविण रस कुठला प्रीतीला ?
पतनाच्या धास्तीविण कस कुठला नीतीला ?
आव्हानाविण असल्या तेज न गे संग्रामा
श्रेयाची श्री न चढे प्रेयाच्या परिणामा
रक्ताचा शाप नरे स्वर्गास्तव झगडावे
हृदयाच्या उःशापे वरवैभव उघडावे
ये, हे सखि मातीचे आश्वासन घेउनि ये
प्रीतीवर विश्वासुन उन्मनमन होउनि ये
ये दिठीत, ये मिठीत, भेट पेट घेत जरा
शत ज्योतींमधुनि करू मातीचा हेत पुरा

२१·५·६१

# इंद्रदिनांचा असर सरेना

इंद्रदिनांचा असर सरेना
विसरू म्हणता विसरेना
चंद्रमदिर जरि सरल्या घडि त्या
स्वप्नांची लय उतरेना

त्या पहिल्या कापूर-दुपारी
झाडे झाली उजवाती
सुरवातीची वाट चालता
घडल्या अंतिम रुजवाती
फुलपंखांची निळी पिसोळी
भिडली माझ्या अधराला
फडफडुनी क्षण मुकाट जडली
तुझ्या हिन्याच्या पदराला
करात कर गुंतला; अबोली
थरथरली पण विखरेना
क्षण ठरला तो व्रण हृदयी पण
रंगांची लय उतरेना
विसरू म्हणता विसरेना

तरुशिखरे अन् घुमट उजळता
सांध्य सनइच्या प्रहराला
कोळिष्टकही कनकजळाने
भिजुनी येता बहराला
अभिरगुलालबुक्याच्या घडिला
झडता सर मम कवनाची

शर रुतल्यागत सय आली तुज
सासरच्या जलभरणाची
कचचंपक गेलीस फेकुनी
दळ त्याचे पण उघडेना
दवात भिजते जरी अहर्निश
गंधाची लय उतरेना
विसरू म्हणता विसरेना

व्यथा-कथा बोललो किती ग ऽ
चांदण्यातल्या अपरात्री
पूल फुलांचा झुला होइतो
बघत एकटक जळपात्री
होउन खंती वदलिस अंती :
" नकळत आतुन ढळले मी
सावरु दे मज, दूर जा कसा
ऋण फेडिन पुढल्या जन्मी. "
जखम गाळितो म्लान चंद्रमा
क्षितिजावरुनी निसरेना
थारोळे जर उरी दाटले
रुधिराची लय उतरेना
विसरू म्हणता विसरेना

पुणे, ३०·६·६१

## प्री ती ची वा ट

प्रीतीची वाट नेहमीच जात असते अथांग जळातून
वाळूवरच्या पावलांनी तिचा माग लागत नसतो
मागे उरते केवळ आगीची पोळणारी धग
पण ती आग खरी रहाते जळातच, भिजल्याशिवाय

इथल्या सुकतीभरतीला पंचांग नाही
दिशाच वादळात सापडलेल्या असतात
आणि लाटांच्या झिंज्या धरीत गटांगळ्या खात असतात
शास्त्रांचे नकाशे आणि गतीची होकायंत्रे

इथेहि पाण्यात पडल्याशिवाय पोहता येत नाही
अंगावरच्या वस्त्राचाहि प्रसंगी गळफास होतो
बेहिशेबी असतो त्याचाच ताळा जमतो
हिशेबाने कुणीच हे पाणी तरला नाही :
तो आपला काठावरून त्याचा खेळ पहात असतो
बुडणाऱ्याला हसत असतो
पण जीव नेहमी मुठीत धरून
मात्र मध्यरात्री

त्याच पाण्याच्या आठवणीने तोच अंथरुणावरझुरत असतो
कारण प्रत्येकाच्या रक्तात थोडेफार हेच पाणी खेळत असते
तरीहि त्याचे पाय भूमीला खिळून असतात
अशांच्या कपाळी सीमाच काय ती लिहिली आहे
या सीमेमुळेच सम्राटाची सहचरीदेखील

बेगुमानपणे पोहणाऱ्या गुलामाच्या गळ्यात पडते
कुरतडणाऱ्या सुखांच्या तुरुंगातून सुटण्यासाठी

ज्याने एकदा केव्हा तरी या पाण्यात स्वतःला झोकलेले असते
त्याचे डोळेच त्या पाण्याची कथा सांगत असतात
त्या डोळ्यांतले पाणी चांदण्यासारखे हसत असते
तेजाबाचे वाफारे उधळीत
भूमीवरचे पापपुण्य त्याच्या दाहात टिकत नाही
ज्यांच्याज्यांच्यावर ते उसळते त्यांचे त्यांचे लोकसंचित भस्म पावते
आणि उरते फक्त पाण्यासारखेच निर्मल, निरंजन, अनादि व्यक्तित्व
जे केवळ त्याच पाण्याचे घडले आहे
आणि मग पाणी पाण्याकडे धाव घेते
सहज, लीलेने, सोत्साह निर्भय

पापपुण्य जळत असताना हेच पाणी गात असते
आदम-इव्हेपासूनच्या सर्व प्रीतिप्रवाश्यांची
ध्यासाभासांची समुद्रगाणी
जी ऐकता ऐकता
आपण लाटांशी खेळू लागतो
समुद्रातली आग घेऊन एकमेकांवर फेकू लागतो
खेळता खेळता पाण्यावरच एक वाट तयार होते
भूमीवरच्या शापिताला निमिषमात्र दिसून जाते
मग त्यालाही वेड लागते
बरळेल त्याचे गाणे होते
गाणे पुरते कळत नाही
घुमल्याशिवाय रहावत नाही

घुमता घुमता आपण नेमके
पोचतो त्या पाण्याच्या काठापर्यंत.
....इथेच पावले बिचकत असतात....
इथेच वाट सुरू होते....
पाण्यातून क्षितिजाकडे....

या पाण्याला तळ नाही अन् वाटेलाहि अंत नाही.

पुणे, १०-७-६१

# का वळून पाहिलेस

का वळून पाहिलेस सावळ्या घडीत त्या ?
थांबलीस का खिळून आंधळ्या झडीत त्या ?
का दिशांत फाकिलेस रंग जांभळे-निळे ?
वेळिलेस का तशात अंग सोनकोवळे ?
का बुजून लाजलीस भेटताच लोचने ?
का जडावल्या ढगांत झाकिलेस चांदणे ?
धीट बोलणे कसे तुला न वाटला गुन्हा ?
का विचारिलेस तूच, "भेटणार ना पुन्हा ?"
माळल्या सरातलीच का दिलीस ओवळे ?
भारिले तरू कशास गर्द गार मोहळे ?
काय जाळ लावण्यास, गाळण्या असा मधू
जाहलीस का रसाळ गोरजातली वधू ?

मुंबई, १·१०·६१

## वारंवार आवर्जून मन म्हणते

वारंवार आवर्जून मन म्हणते हट्ट धरून,
" तेच प्रेम करतेस अजून ऊर भरून, जीव भरून"
पण बुद्धी निर्दय, दक्ष, लक्ष साक्षी पुढे करून
म्हणते, " वेड्या, डोळे उघड; भ्रम नेहमी सुंदर दुरून."

सत्य थंड जड शिळा...तिचा घेतो आधार धीर
अकस्मात् अशी वागतेस !....तिलादेखील जाते चीर
नाही काय काजळकाळी कालच रेशमी अवस लेऊन
विजेसारखी येऊन गेलीस हिरवे सोने हाती देऊन ?

तट पाण्यात खचून खिरून थोपटली मी तुझी पाठ
एकटाच हिंडलो अहोरात्र आठवणींचा हिरवा काठ
तरी आज म्हणालीसच, "विस्कटला का तुमचा रंग ?
राग ? विकल्प ? की हा खोल अकल्पित अपेक्षाभंग ?"

झोंबून तुझा जखमी सूर असा जळून आला ऊर
कळले, खऱ्या दुःखापासून सुख नसते फारसे दूर
तरी बोललो, " पहिला पूर असा वाया गेल्यानंतर
उघडा गाळ बघून वाटते, आता पडले केवढे अंतर !"

तेच प्रेम करतेस अजून ऊर भरून, जीव भरून
म्हणून पूर सरूनदेखील वहातो अजून तग धरून

२०·१०·६१

## राग नाही रोष नाही

राग नाही, रोष नाही, खोल थोडा आहे विषाद
या देहाची मातीच अशी !...प्रेमासंगे जमतो प्रमाद
पाण्याखाली गाळ जसा, ज्योतीखाली छाया जशी
प्रीतीलाही वेढून असते आसक्तीची माया तशी
पण असा अकस्मात् आपलाच आपणां लागता तळ
वरची ज्योत उजळ होऊन खालचे पाणी होते निवळ
कळले मोकळ्या हवेत उन्हात फुलासारखा फुलतो प्राण
मूळचा मळ गिळतागिळताच आतून निर्मळ मिळते त्राण
वाऱ्या-उन्हासारख्या तुला मोकळ्या आहेत दाही दिशा
मुक्तीसाठीच जखमी उरात फुलत असतात उषा-निशा
वाटल्यास खरेच विसर मला....पण सतत फुलत रहा
व्यथा माझी स्मरलीच तर....तिच्यात नवे क्षितिज पहा
करू नकोस खंत असा माझ्यात उरला म्हणून विषाद
पूजा खरी असेल तर त्याचादेखील होईल प्रसाद

२२·११·६१

## सूर सूर

खांद्यावर गलित सखी
वेल कशी झुकलेली
मांडीवर अन् गितार
तार तार थकलेली

पेला कार्र मदिरेचा
अर्ध रिता थिजलेला
आणि कवे ! शिणलेला
गाल तुझा भिजलेला

माथ्यावर द्राक्षवेल
क्वचित कुठे सुकलेली
द्राक्षे पण जाग जाग
आग जणू पिकलेली

चांदण्यास आज पूर
घर उरले दूर दूर
शब्दांविण गात्र गात्र
वस्तुमात्र सूर सूर

२६·७·६३

## उत्तर

'विसर' म्हणाया कधी तुझे मी स्मरण ठेविले होते ?
दिसल्यावर तू हसल्ये मी ते मुळात होते खोटे
निघताना तू दरवेळी जे जमले डोळां पाणी ?
ते तर हुकमी अस्त्र आमुचे अमोघ बाणावाणी !
आणि लाघवी सर्व वागणे ? ती तर अमुची माया !
हावभाव ते डावच केवळ ठाव खरा छपवाया !
स्वभावत: स्त्री नसलेल्याही भावांची अभिनेत्री
गात्रांनी जे बोलुन जाते पुसुन टाकिते नेत्री
ती सलगी लडिवाळ तुझ्याशी केली होती ना मी ?
खोलीतिल आरशापुढेही तशीच करितो आम्ही !
ती पत्रे, त्या चिठ्याचपाटया आणि चोरटया भेटी ?
होती माझी उमेदवारी लिहावयाला गोष्टी !
म्हणुन सांगते नको यांतले विसरुन जाऊ काही
टाकुन जा हे असे भोवरे पुढे पुढील प्रवाही

२८·७ ६३

## कृतार्थ

आल्हाद-उत्साहाच्या धबधब्याची
कर्पूरगौर देवताच अशी तू
रजतस्मिताचा चुरा उधळीत
स्वागतार्थ सामोरी आलीस दारात
पुढे करीत जिवणीवरचे
डाळिंबीचे लालचुटूक टवटवीत फूल
मिरवीत अंगात पिसावलेल्या
हिरव्यापिवळ्या पिसोळ्यांचा
रेषोत्कर्षक उन्हेरी झगा
आणि रुळवीत उभार उरोजांच्या मधोमध
उभट नाजूक झिगझिगणारा
कांचन-क्रूस

घेऊन गेलीस उल्हासाने
खानदान ऐश्वर्याच्या दिवाणखान्यात
उधळीत नितळ उघड्या अंगांगांतून
तरतरीत आठ मुलांचे संतृप्त बाळसे
शरदातल्या द्वादशीच्या चांदण्यासारखे
बसवून मला झुलत्या आरामखुर्चीत
विराजलीस पुढच्या नक्षीदार शिसवी स्टुलावर
व्हिन्सीच्या चित्रांतील नायिकेसारखी
भोवती घेऊन आपल्या वात्सल्याचा प्रफुल्ल पिसारा
ज्याच्यावर तुझेच आगळे कोवळे तोंडवळे
वेगवेगळ्या वयांतले

तुझे डोळे लागले होते माझ्यावर
सोनकिनारी चंद्रकोर-भिंगांतून
फुललेल्या शृंगारशाखेवर स्थिरावलेल्या
निळ्या पाखरांच्या युगुलासारखे :
अशीच बसली असेल का माग्दालेना
स्निग्ध, सोत्कंठ, ख्रिस्ताच्या शेजारी ?
परीसारख्या मुलीकरवी
भरलीस काचेची गुलछडी
फेसाळ गव्हाळ्या मदिरेने
मनात आले, ही शेलाटी पोर घ्यावी सून करून
पण म्हणालो, " ही तर इतक्यात नवरी झाली. "
तेव्हा तूच बोललीस, " घेणार ना सून करून ? "

दाखवलेस घरातले आल्बम
विणीत एकेका चित्रावर
स्मृतींची शुभ्र सुकुमार झालर
पाद्री दीराला सांगू लागलीस
कॉलेजातल्या एकेक गोष्टी
तीस वर्षांपूर्वीच्या, नुकत्याच घडल्यासारख्या
ज्या मी केव्हाच विसरलो होतो :
माझ्या ख्रिस्तचित्राला मिळालेल्या बक्षिसाच्या
प्रोफेसरांना दिलेल्या चमकदार उत्तरांच्या
वर्गातल्या वर्गात रचलेल्या कवितांच्या
रेखाटलेल्या चित्रांच्या, मी लावलेल्या लोभाच्या
आणि पाश्चात्त्य संगीताच्या तासाला
मजकडून घडलेल्या गफलतींच्या
जुन्या आठवणींच्या त्या गर्द काळोख्या अरण्यात
अकस्मात उघडले सुरम्य सोज्ज्वळ ऊन

जादूच्या पंख्यासारखे
आणि मावळलेले तारुण्य
एकदम बहरून आले
माघातली दुपार होऊन
म्हणालीस, " तेव्हासारखे गा पुन्हा एकदा
वर्षे तुम्हाला शिवली नाहीत. "
असा गायलो ऊर भरून
की गळा स्रवला अमृत होऊन....

होतीस तशीच आहेस अजून
व्हर्जिन मेरी, पण सुखदु:खांची तड ओलांडलेली

कृतार्थ अशी पाहून तुला
काटाकाटा फुलला आहे
वाळवंटातून हिंडला जीव
शहाळे पीत बसला आहे
डाळिंबीचे फूल होऊन
उन्हात आता झुलतो आहे
हिरव्या-पिवळ्या पिसोळ्यांचा
थवा तेवढा बघतो आहे

पणजी, ११·८·६४

# घनवदन

करि गहन हृदयदोहन गे
घनवदन मदनमोहन गे

तो दूर सखे, मी धावा
तो सूर सखे, मी पावा
रति मी, तो रससाजण गे
घनवदन मदनमोहन गे

तो नटनायक स्वच्छंदी
मी अटकेतील गृहबंदी
परि करि घर क्रीडांगण गे
घनवदन मदनमोहन गे

तो कदंब, मी कालिंदी
मी विषण्ण, तो आनंदी
परि चिरसुख दे आंदण गे
घनवदन मदनमोहन गे

जरि वन मी घनराईंचे
मज भरते ये जाईचे
मग उधळी हरिचंदन गे
घनवदन मदनमोहन गे

मी सुम जरि कोमलदेही
तो त्यातिल गंध विदेही
मरण क्षण संजीवन गे
घनवदन मदनमोहन गे

पणजी, १९६४

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२५०७१
दा. क्र. २८८५०
२०१४/२०१८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# अनलशिखे श्रीमंत

मानेवरती मिरवित शीतळ सोनकेशरी जाळ
समुद्रसंभव सकाळशी तू उगवलीस वेल्हाळ :
नितळ उन्हाला वितळविणारे आरसपानी भाळ,
चढेल भिवया, स्वप्निल डोळे तपाजवर्ण विशाळ :
सावपणाने लबाड घेती चतुर सहज अंदाज
किती अधिक विंधिले असावध कालच्याहुनी आज
तंग कुसुंबी झग्यात तटले मर्मरशिल्पी अंग :
प्रकाशमंडित जलसे उधळित नवथर रंगतरंग,
सरोजसुंदर उरोज उन्नत अढळ रतीची ढाल :
भार असह जाहल्यापरी तव मंद मदालस चाल

रूपमत्त यौवनसम्राज्ञी ! अनलशिखे श्रीमंत !
तुझ्या दर्शने मरुनि निमिष मी स्तवात फिरुनि जिवंत

गोवा-पुणे प्रवासात, १३·८·६६

## दंश

डसला मजला निळा भ्रमर सखि, चढे निळी कावीळ :
डोळ्यांमधले काजळदेखिल झाले गे घननीळ

निळे कावळे, निळे पारवे,
निळी गोरवे, निळीं तारवे,
निळे भुवनवन, निळे गगनघन, निळाच सिंधु सलील

निळावले मन, निळावले तन,
निळावले नवनीत घटातुन,
निळ्या वेळूंतिल शीळ निळी सखि, निळा उरातिल पीळ

निळ्या निळ्या प्राणांतिल ज्योती,
निळी निळी डोळ्यांतिल मोती,
घननीळाच्या निळ्या गालिचा निळा निळा मी तीळ

पणजी, १५·९·६६

# भरलेले दोन घडे

भरलेले दोन घडे
उपवनभर ओघळले :
भिजलेले नयन दोन
निमिषातच मोहळले;

कमळाचे दोन कळे
मधुगंधी उलगडले :
रसविलोल सूर दोन
समयोचित गुणगुणले;

स्मरविव्हल दोन मने
सल सलून झिणझिणली,
सळसळत्या सांजेतुन
पान पान मिणमिणली.

पणजी, १९६७

# छेडु नको पण भलत्या वेळी

छेड छेड सखि, हक्क तुझा तो
छेडु नको पण भलत्या वेळी
काळोखी उमलता काजवा
आणिक मनच्या चांदणवेली

उठल्यासुटल्या देउ नको ग
भान मला वाढत्या वयाचे
असेच आहे धुंदपणाने
वयास चकवित फुलावयाचे

जळणाऱ्या या सिग्रेटीवर
उगीच का सवतीचा डोळा ?
विझती राखेसवे मागच्या
ज्वाळांतिल ती वर्षे सोळा

स्मरविव्हल माझ्या कवितांचा
भलता तुजला काच कशाला ?
नात् पणत् सखिंसह अपुल्या
खचित याच घेतील उशाला !

भरला पेला बघत गव्हाळी
का तू भिवई चढवुनि दारी
गद्य जिण्याचे सल वितळू दे
निथळू दे जे उले जिव्हारी

क्वचित साहसे विचकतेस का
धोक्याविण का रुची जिण्याला ?
सहज कुणाला संधि मिळे का
मृत्यूलाही लाजविण्याला ?

जीव नसे का कुणावरुनि तरि
ओवाळुनि टाकायासाठी ?
त्याचमुळे ना पडल्या अपुल्या
येथे जल्मजुगाच्या गाठी

एकान्ती वेदान्त नको ग
चिर वश मी तव लावण्याला
छेडिलेस तू जरी कितीही
क्षय न माझिया तारुण्याला

१४·९·६८

## संग

कचकृष्णकलापविलासित तू
सितवस्त्रसुशोभित पुष्पमयी
कमलाक्षपदे कलहंसगती
शिरता सखि या अभिरामगृही

उजळून नवे फुलवात-दिवे
घृतशीतळते मधुरात्र निळी,
प्रतिगात्र तटे उतटून तृषा
स्मरगंध तुझा स्फुरता जवळी...

जवळीक तुझी कवळीक बने,
बन केतकिचे मदमत्त तनू,
कवळून तुला धरिता हृदयी
रुधिरी विलसे नव इंद्रधनू;

मन मोहरुनी रस साकळतो
धरु आवरुनी किति ओष्ठतटी ?
किती चुंबु तुला सखि आणि कुठे ?
रसतीर्थ तुझ्या प्रतिरंध्रपुटी !

गतकाल मिटे, पट सर्व फिटे,
प्रगटे तव शाश्वत सुंदरता,
प्रतिआकृतितून तुझ्या विंनटे
रतिची प्रतिभापटु चित्रकथा;

तनुंची युति ही स्मरयज्ञ गमे :
अनलातुन आपण शीत शिखा,

विधुकांत असा मधुदेह सखी !
नच अंत म्हणूनच आत्मसुखा;

शिणुनी तव गे नयने मिटता,
रतितृप्त मुखी स्मित पालवता
मृतितून विराट विभूति मला
निमिषातच ये हृदि आकळता;

शयनस्थ अशी रसचित्रचशी
बघता तुज विस्मय हाच पडे :
किति मानुष तू किति आदिजनी
मज केवि असा तव संग घडे !

पणजी, १·१·६९

# आम्ही देखिली अतुल देखणी

आम्ही देखिली अतुल देखणी शेषफणेवर कुणि तरुणी
जिच्या द्युतीने मिटले तारे, विटले सारे शशितरणी

नटरंगी ती सहज हासता चवदा भुवने रसरसली
आणि नाचता वने-उपवने तारुण्याने मुसमुसली;
नजर सांडता फुलुन चांदणे झाडे झाली कल्पतरू,
श्वासासंगे वास वहरले, दरवळले चंदन-अगरू;
तिने अम्हां एकांति चुंबिले, किति सांगाव्या आठवणी ?
दूर-जवळचे म्हणती सारे अमुच्यावर झाली करणी;
सुखदु:खाची तमा न उरली, इथेच पुरली सर्व धणी :
आम्ही देखिली अतुल देखणी शेषफणेवर कुणि तरुणी

तेव्हापासुन हृदयी अमुच्या कडक डफावर वग झडतो,
सहज बोलल्या बोलासंगे रसवंतीवर नग चढतो :
पडती टाळ्या, झडती मुजरे, फुले उधळिती किति युवती;
कुणी घालुनी आडुन डोळे मिठित दिठीच्या आवळिती
मख्ख आम्ही तरि सदा सदाशिव असून नसतो इथे जनी,
लावण्याचे भोग भोगितो तिच्यासवे चवदा भुंवनी;
कामरूपिणी अशी लाभता वैभव इथले कोण गणी ?
आम्ही देखिली अतुल देखणी शेषफणेवर कुणि तरुणी

पणजी, ११·९·६९

# घरचिये बांये जोइली बिंदुली

घरचिये बांये । जोइली बिंदुली
ओंजळिये संचली । यमुना गे माय

प्याल्ये तशी धाल्ये । गवळण जाल्ये
साखरेचे आळे । मन खिरले गे माय

पावले पावली । तेथे राने पाल्हवली
सुगंध-साउली । फळे लवली गे माय

जाले दशनाद रावे । लक्ष निनादले पावे
सुख जाणिवे न मावे । ते मज फावे गे माय

मिटता नयनु । दिठी मुसावला घनु
पोटी देवकीनंदनु । मज झोंबला गे माय

नेत्रांविण चित्रवती । पतीविण पुत्रवती
निळा बाळकृष्ण ओटी । माझ्या खेळे गे माय

पणजी, २·३·७०

# मज सजवी बाइये

मज सजवी बाइये, मज सजवी बाइये
सांजसाजण गे माझा काठी थांबलेला आहे

ऐसी करी सजावट
काये घडेल पालट
अष्टांगे मी अलगट, गुणे लाजवीन साये
सांजसाजण गे माझा काठी थांबलेला आहे

घाली जायांनी बुचडा
हाती मोतियांचा चुडा
कानीं कुंडलांचा जोडा जो का उजियेडे न्हाये
सांजसाजण गे माझा काठी थांबलेला आहे

चोळी चांदण-चोखडी
काळया नवमीची साडी
फेनघुंगुरांची जोडी मज चढवून पाहे
सांजसाजण गे माझा काठी थांबलेला आहे

डोळा अवसेची रेखा
भाळी उगवेचा टिका
ऐसा करी आखातिखा जेणे जिवलगु धाये
सांजसाजण गे माझा काठी थांबलेला आहे

काय नेऊ त्याच्यासाठी
काही नुरलेच गाठी
भेटून त्या उरीपोटी माझ्या सुखवीन दाहे
सांजसाजण गे माझा काठी थांबलेला आहे

पणजी, ३·३·७०

## माझ्या कानी बाई वाजे अलगुज

माझ्या कानी बाई । वाजे अलगुज
सांगो जाता तुज । गुज सांगता न ये

देखावे ते डोळां । दिसे बाई निळे
सोज्ज्वळे कोवळे । वाचे वानिता न ये

घालावा तो मुखी । लोणियाचा घास
गोरसाचा वास । सये वारिता न ये

हाती घेता माती । होतो तिचा बुका
अशा स्पर्शसुखा । सर लाविता न ये

मागेपुढे वेणू । चोहींकडे धेनू
नंदाचा नंदनू । तरी धरिता न ये

सुखानेहि असा । जीव कासावीस
तरी हा परिस । दुरी सारिता न ये

बोरी, १३·९·७०

## आतला आतला सये

आतला आतला सये काळोख मातला
विळखा घातला मज काळियाने

नाग झाला सूळ माझे नासिले गे कूळ
मज माझे मूळ पण गवसले

आटली अवस, मुळी पेटला दिवस
रत्नांचा पाऊस अंगी ओसंडला

आता माझ्या प्राणा झाला कालियाच कान्हा
त्रिभुवना पान्हा नेणे झाल्ये कैशी

मुंबई, ३१·१२·७०

# विरहुली

घोळव साजणयाद विरहुली
मिळेल त्यातच दाद विरहुली
सादच गे पडसाद विरहुली
हाच सुखद संवाद विरहुली

आषाढाचा मेघ विरहुली
त्यातच उजळे रेघ विरहुली
धरेस पडता भेग विरहुली
वरवर्षेला वेग विरहुली

घाय आपुला गाय विरहुली
खिरे आसवी साय विरहुली
जळता ज्योती धाय विरहुली
साजण मग न समाय विरहुली

बोरी, १४·२·७१

## कोंभ

मोकळ्या कराया आखडलेल्या संधी
" चल, " हिला म्हणालो, " हिंडुनि येऊ बांधी "
बोलांविण होती चाल शुष्क झालेली :
गोठली हिवें की फुलांवेगळी फांदी

झावळांत होती अजून थोडी सांज,
पाण्यात मंदशी कुठे कुठे किरमीज,
गडबडुन विखरले एक भिरे आकाशी
तो गर्द घनातुन धडकुन गेली वीज

सरसरून आला गार झोंबरा वारा,
सडसडून गेल्या चार खिलाडी धारा,
निमिषात तदा खांद्यास भिडुनिया खांदा
हाडांतुन फिरला चपळ कोवळा पारा

न कळून गुंतले सहज आमुचे हात
उमललो बहरलो भिजलेल्या वस्त्रात
पाऊस भोगिता उमगुन चुकले आम्हां
हाडांसहि कैसे कोंभ नवे फुटतात

नवी दिल्ली, १९·८·७१

# वीस वर्षांनंतर

सांज अंधारून येता : सांडता पाण्यात कुंकू
भासले सिंदूर भांगी घालुनी आलीस जिंकू;
कुंतलांच्या स्रोतपाती वाटले कृष्णेत न्हालो
तो तुझ्या ताराकटाक्षे मी पुन्हा घायाळ झालो

ऐकिली ओघी तुझी ती कानडी श्रीरंगगाणी :
भाळला भामेस कैसा मुक्त तो सारंगपाणी
वीस वर्षांमागची जी वाहिली गीते तुला मी
वाजली वीणारवी ती गायिल्यावाचून रोमी

तेधवा होतीस श्यामा कोमला नित्याभिरामा,
पेटुनी झालीस कैसी काल माझी सत्यभामा ?
चालता माडांमधोनी पौर्णिमेचा चंद्र आला,
भेटुनी खांद्यास खांदा लागला अन् गाल गाला

आणि दारी पोचता, तू पूर्णिमा घालून पाठी
वेंघुनी छायेत पोटी घेतले प्राशून ओठी...
का दिली वाळू वयाची वीस वर्षे सांग वाया ?
थांग लागेना तरीही तृप्त माझी श्रांत काया !

बोरी, २.१२.७१

## केशी तुझिया फुले

केशी तुझिया फुले उगवतिल, तुला कशाला वेणी ?
चांदण्यास शिणगार कशाला ? बसशिल तेथे लेणी !
काळोखातहि नीळ फुलवशिल, चमेलीत वनवाटा
तळमळणाऱ्या पुळणीवर अन् फेनमोगरी लाटा
पहाटशी तू अमल निरागस, संध्येपरिसहि भोळी
जुन्याच ओळी गुणगुणताना जमतिल सोनपिसोळी
तुझी पावले भिडता येइल तीर्थकळा पाण्याला
तुझ्या स्वरांच्या स्पर्शे येइल अर्थ नवा गाण्याला
वाळूतिलही तृणपात्याशी तुझे कोवळे नाते
तुझ्या दिठीने क्षितिजीचेही अभ्र वितळुनी जाते
अशा तुला का हवे प्रसाधन ? तूच तुझे गऽलेणे
तुला पाहिल्यामुळे आमुचे कृतार्थ इथले येणे !

२८·२·७२

## नक्षत्रांनी बांधुनि कुंतल

नक्षत्रांनी बांधुनि कुंतल रात कोवळी निळी
तलावात मुखबिंब लोकिते पाय टाकुनी जळी
घे पदराने विंझणवारा करून चोळी ढिली:
हुरळुनिया मोगरा बहरला कळीकळीला खळी
उभेच काठी थकुनि पेंगती दुधी विजेचे दिवे,
थव्याथव्यांनी उघडझापती झाडीतुनि काजवे,
चर्मतंतुवर कुणी मांडकी खर्ज छेडिते नवा,
हवेत न कळे कसा उसवला मृद्गंधी गारवा :
खचित कुठे तरि या वाऱ्याला सर गेली खेटुनी;
किती उन्हाळे सुकेच गेले सखि तुजला भेटुनी !

बोरी, १९·४·७२

# संसार तुझा फुलताना

संसार तुझा फुलताना
तू त्यात सुखे खुलताना
बघतो मी लांबून चित्र ते विधुसम मावळताना

तुज शब्द दिला वरताना
तो मोही डळमळताना
दिला हात तू मला नेहमी थकून ढासळताना

मज पचली रविची लाही
ती तुझीच सखि पुण्याई
म्हणुनि असा अतिरसी नाहतो रसलोलुप असताना

जरि आपण दोन ठिकाणी
चांदण्यात फुलते पाणी
एकजीव आकाशधरित्री परस्परी खिरताना

१७·४·७३

## चे टू क

त्याची मज बाई    सोडवेना ओढ;
लाडीगोडी, मीड    मोडवेना.

दृष्टीनेच मज    बांधिले खांबाला,
प्राण हा काढिला    वेणुनादे.

अशी मी संसारी    नांदू तरी कशी ?
पार वेडीपिशी    जगी ठेल्ये !

ध्याता त्याते माझे    विसरले नाव,
शोधू गेल्ये गाव    सापडेना.

पारखाया मज    पाहिले दर्पणी :
रूपाची रेखणी    आढळेना.

असे कसे झाले    चेटूक साजणी ?
आता वेणीफणी    काय कामा ?

बोरी, २.५.७४

## तुझ्या रानात रे

तुझ्या रानात रे, फुलापानांत रे,
खट्याळ खुस्खूस हसू,
पाण्यात कोवळी चावट चावळी,
कशी रे जवळी बसू!

तुझ्या रानात रे, नुरे भानात मी,
वाऱ्याने घुंघट ढळे,
सापाची चाहूल लागून पाऊल
मुडून पैंजण गळे.

तुझ्या रानात रे, माझ्या प्राणात रे,
व्याकुळ वाजतो वेणू,
घामाने ओली चुनडी चोळी,
कोठून बळ मी आणू?

तुझ्या रानात रे, माझ्या थानांत रे,
आतून मातती ऋतू,
माया ही आवर, काया ही सावर,
घागर जाते रे उतू!

१९७५

## दिसली नसतीस तर

रतनअबोलीची वेणी माळलेली
आणि निळ्या-जांभळ्या वस्त्रालंकारांत
संध्येसारखी बहरलेली तू
तळ्याकाठच्या केवड्याच्या बनात
आपल्याशीच हसताना मला दिसली नसतीस
तर आज माझ्या जीवनाच्या अस्ताचलावर
हा भुलावणा सप्तरंगी सोहळा
असा सर्वांगांनी फुलारलाच नसता.

आपल्याच नादात तू
पाठ फिरवून परत जाताना
तुझी पैंजणपावले जीवघेण्या लयीत
तशी पडत राहिली नसती
तर माझ्या आनंदविभोर शब्दांतून
कातरवेळची कातरता
आज अशी झिणझिणत राहिलीच नसती.

अबोलकेपणाच्या गूढ गाढाईने
जाईजुईच्या सांद्र-मंद सुगंधाचा ळळा
सहज चुकार स्पर्शाने तू मला लावला नसतास
तर उमलत्या फुलपाखरांची
आणि मुक्याभाबड्या जनावरांची
आर्जवी हळुवार भाषा
इतक्या स्पष्टपणाने मला कळलीच नसती.

तू कशामुळे माझी जिवलग झालीस
ते खरेच मला आता आठवत नाही;
पण मला तोडताना
समुद्रकाठच्या सुरूंच्या बनात
मिट्ट काळोखातून चंद्रकोर उगवेपर्यंत
तू मुसमुसत राहिलीस
हे मात्र अजून मी विसरू शकलेलो नाही.
त्या वेळची तुझी ती आसवे
अजून माझ्या कंठाशी तुडुंबलेली आहेत.
तू तेव्हा तशी मुसमुसली नसतीस
तर माझ्या शृंगाराचा अशोक
आज करुणेच्या आरक्त फुलांनी
असा डवरलाच नसता.

तू तेव्हा आकाशाएवढी विशाल
आणि अवसेच्या गर्भासारखी दारुण
निराशा मला देऊन गेली नसतीस
तर स्वत:च्याच जीवन-शोकांतिकेचा
मनमुराद रस चाखून
नि:संग अवधूतासारखा
मी या मध्यरात्रीच्या चांदण्यात
असा हिंडत राहिलोच नसतो.

तू केवळ माझी प्रेयसी नव्हतीस :
माझी सशरीर नियती होतीस.
तसे नसते तर आज जो काय मी झालो आहे
तो झालोच नसतो.

बोरी, १४·८·७६

## चालीमधली वीज कुठे ती?

चालीमधली वीज कुठे ती, गालांतिल किर्मीज ?
कशी फिकटली अधरावरची शरदविधूची बीज ?

कुठे हरपली नयनांतिल ती नक्षत्रांची फैर ?
अन् गात्रांतिल चापल्याच्या मल्हाराची खैर ?

खळीतले ते गाभुळ हासू बसे कसे ग रुसून् ?
फुललेल्या वेलीस कसा गे गेला नाग डसून् ?

भरतीआधी ढळले कैसे अंगलटीचे काठ ?
तुला पाखरा जडली कैसी वहिवाटीची वाट ?

धसमुसळ्या का शृंगाराने गेलिस तू चुरडून ?
सकाळपारी कसे झोंबले दुपारचे तुज ऊन ?

फोंडा, २०.१०.७६

## धुळीतले फूल

सखि, मी कधितरि होइन धूळ,
तूही कधितरि होशिल धूळ,
तिथेच पण अपुले चिरचुंबन
उठेल उमलुनि होउनि फूल.

जीवन अपुले असेल भूल,
प्रेमहि अपुले असेल खूळ,
फुलात पण त्या नव्या उषेचे
खुलेल अळित्याचे पाऊल.

जगरहाटिचा कशास शूल ?
जनकलहाचे मनात मूळ ?
देऊ-घेऊ प्रेमच, जाणुनि
शिशिरी मधुऋतुची चाहूल.

फूल जरी निमिषाची हूल,
तिरपीने होईल मद्गुल,
क्षण-स्मिते तरि सावरील ते
जगात गोंधळलेले मूल.

पर्वरी, १०·७·७७

## ऋतु हिरवा

संध्येचा घट उपडा,
नील घना सोनकडा,
बैस जरा, आज धरा
पाचूंचा पट उघडा.

गिरि, ओहळ गाढ निळे,
फिटले अपुलेहि पिळे,
चाफेकळि, ये जवळी,
बघु मिथुनोत्सुक बगळे.

चुरल्यागत सखि मरवा
मिरमिरते तरल हवा,
ये कवेत, या हवेत
यासम नच ऋतु हिरवा.

बेती आल्त, ८·८·७८

# काजवे

नको म्हणू झाले फार आज घरात काजवे :
जाण भाग्यानेच आले दिवे हिरवे हिरवे,
आपुलाल्या महालात होती डोलणाऱ्या हंड्या,
पावसाळी काळोखात ज्योती ढाळितात थंड्या.

रात्र माझ्यापुढे रंक, दीन तुझ्यापुढे राणी,
तुझ्या माझ्या शृंगाराला बघ शृंगारिले त्यांनी,
अशा वेळी सांग कसे तुझे पेंगुळती डोळे ?
जादुगार पावसाचे दिवेसुद्धा असे ओले !

गडे रात गारव्याची, तू मी जोडी पारव्यांची,
जाग जरा, आम्हांसाठी रांग लागली दिव्यांची.

बेती आल्त, ८·८·७८

# ये

व्योम-निळे मन होत सजणा
स्मरकरुणाघन होउन ये,
कालिंदी-कलहंसा माझ्या
अतल-तलातुन पोहुन ये.

घनतिमिराचा घुंगट माझा
सुमपंखांनी फाडित ये,
चांदकडांतुन रजतमनोहर
सडा स्मितांचा पाडित ये.

व्यथा तुजमुळे रजनीगंधा :
मोहर त्यांचा उलवित ये,
अंधविकल हे सकल दिगंतर
गंधे त्यांच्या फुलवित ये.

रिमझिम हिमशीतल धारांनी
उरले मीपण मिटवित ये,
अचलनिरंजन अ-मनसंगमी
निरांजनोत्सव नटवित ये.

पुणे, १४·१०·७८

## ना ते

पिकलेले सखि ! अपुले नाते
सोनपावसी न्हाते,
अंगणातले तृणपातेही
गगनरागिणी गाते.

शरदातिल ओढ्यासम निर्मल
तुझा नि माझा ओढा,
चार तपांनंतरही तू मज
सोळांचीच नवोढा.

वनपर्वातिल स्मृतिगुंफांतुन
अजुन झुळझुळे पावा,
तुझ्या मठीच्या वटछायेतळि
जगत्त्रयास विसावा.

इथेच सखि ! तीर्थाटन घडुनी
सफळ सुखी मावंदे,
गळ्यातली मोगरी उधळुनी
लाजविले गोविंदे.

पणजी, २६·३·७९

# मी चुकले त्याच्या गावा

मी चुकले त्याच्या गावा
तरि तोच जिवास विसावा
सखि, तोच जिवास विसावा

कालच न्हाले
सौरी झाले
दिठित निळा दिष्टावा
सखि, तोच जिवास विसावा

माथा बिंदी
मन कालिंदी
जळि चांदण-शिडकावा
सखि, तोच जिवास विसावा

तनुचा अणुअणु
वाजे रुणुझुणु
अष्टदिशांतुन पावा
सखि, तोच जिवास विसावा

स्वरांतुनी हरि
साठवुनी उरि
डोळे मिटुन पहावा
सखि, तोच जिवास विसावा

मिरज, २७.४.७९

# तू शहाणी

तू शहाणी जाणसी द्यावे हसू केव्हा किती
बोलणे अन् वागणे ही जोखुनी त्यांची रती.

अत्तराची कूपिकाशी प्रीति तू सांभाळिशी,
एक फाया देउनी तू व्योम केशी माळिशी.

जाळ गंधे पेरण्याची साधिली कैशी तऱ्हा ?
मंद अस्ताईच झाली जीवघेणा अंतरा !

या तुझ्या गे कौशलाने धूपसा मी पेटलो :
नष्ट होता, सृष्टिजाती मातुनी कोंदाटलो.

खेद नाही होमल्याचा : मी मला ओलांडिले,
अल्पसे कुंकू तुझे राखेत माझ्या सांडले !

बेती आल्त, २३·६·७९

# गीत माझे गायलो मी

गीत माझे गायलो मी रंगलेल्या ऐलकाठी
पेटलेले पैल तेव्हा थांबले माझ्याचसाठी.

गीत ओलावीत गेले जाणिवेच्या लक्ष वाटा :
थाटमाटी त्याचिया आलीस तू माझ्याचसाठी.

बोलता काही दिवाणे ओठ ओले फूल झाले,
केवडा डोकावला काव्यांतुनी माझ्याचसाठी.

दृष्ट खोटी लागली अन् फूल ते निर्माल्य झाले :
झाकलेला गंध त्याचा फाकला माझ्याचसाठी.

ऐल रंगांचे उडाले, पोचलो मी पैलकाठी,
थांबली होतीस गे तेथेहि तू माझ्याचसाठी.

मुंबई, १९·८·७९

## सा व धा न

सावधान, सावधान

मदन फिरे धरुनि करे
सुमनचाप सुमनबाण. सावधान, सावधान

जरि न दिसे, तो न फसे
अचुक टिपी पंच प्राण. सावधान, सावधान

नर न म्हणे, सुर न म्हणे
टिपित जाय थोर सान. सावधान, सावधान

रुद्रासहि शर न चुके
झुकते विधिचीहि मान. सावधान, सावधान

परि न डरा, प्रीति करा
भरिल तोच नविन त्राण. सावधान, सावधान

तिजमुळेच स्मर अनंग
हृदयसंग परम ज्ञान. सावधान, सावधान

युवजन हो, कविजन हो
गा गा रति-मण गान
प्रीति जिथे रसरसते
स्मर तेथे सुखनिधान, सावधान, सावधान

११·६·१९८०

## समुद्र बिलोरी ऐना

समुद्र बिलोरी ऐना
सृष्टीला पाचवा म्हैना

वाकले माडांचे माथे,
चांदणे पाण्यात न्हाते,
आकाशदिवे लावीत आली
कार्तिक नौमीची रैना.

कटीस अंजिरी नेसू,
गालांत मिस्किल हसू,
मयूरपंखी, मधुर डंखी
उडाली गोरटी मैना.

लावण्य जातसे उतू,
वायाच चालला ऋतू
अशाच वेळी गेलीस का तू
करून जिवाची दैना ?

आंबोली घाट, २२·१०·८०

## उ र्व शी

सखे साजणी सिंधुजळी तव अळित्याच्या पाऊलखुणा
तुझ्या निऱ्यांच्या कृष्णकिनारी नटवुनि गेल्या गिरिगगना

तुझ्या स्मिताचा पसरुनि पारा पारावारावर झिळई
पापणिच्या तव छायेसरशी वनराईवर मउ दुळई

उदवियल्या तव कचबंधाच्या गंध झुले पवनावरणी
तव चरणांचे उडले घुंगुर झाले नभि नक्षत्रमणी

तुटलेली तव वेणी झाली कोर विधूची लवलवती
तिच्या द्युतीने कडेकपारी धवल पयाने पाझरती

सखे उर्वशी नाहि उमगले येउनि कधि गेलीस कशी
तुला पाहिल्याविना कशीही आग भुगभुगे उरी अशी

पर्वरी आल्त, २१·८·८१

## दिवा असाच राहु दे

दिवा असाच राहु दे तुला निवांत पाहु दे
तप:श्रियेत गे तुझ्या मला उदंड न्हाउ दे

व्यथा पिकून गे तुझ्या मुखी सुखे विसावल्या
कथा बनून कोवळ्या रसावुनी मुसावल्या

ऋतू सहाहि ढाळिती किती नव्या नव्या कळा
जरेत आगळ्या तुझ्या अपूर्व गंधसोहळा !

कधी कधी मनास ये उदास एकटेपणा
चराचरीहि जाणवे जुनाट तोचतोपणा

चुकून ये कुणी तरी मुलेही दूर पांगली
दुरावलीत माणसे जरी मुळात चांगली

असह्य एकटेपणी तुझीच ओढ लागते
पुनश्च मर्गळीतही प्रसन्न ज्योत जागते

तुझीच साथ राहिली भरून जीव लाहु दे
सरून रात्र जाउ दे पुन्हा पहाट होउ दे

पर्वरी आल्त, २८·२·८३

## नको रागेजू साजणी

नको रागेजू साजणी
माझा स्वभावच असा
पाय फुटल्यापासून
मला हिंडण्याचा वसा

नाही उचलिले काही
जग पाहून हर्षलो
कुणी माणूस भेटता
मेघ होऊन वर्षलो

जिथे तिथे पीक पाणी
नाही सुखा काही उणे
वारे पिऊन बागडे
माझ्या मुखातले गाणे

लागे घरावर दिवा
ही तो तुझीच कमाई
आणि साखरपाणीशी
तुझी माझी दिल्जमाई

पर्वरी आल्त, २१·३·८३

## विस्मरेन जीवनात

विस्मरेन जीवनात मी तुला कसा ?
लोपतो कधी कधी मलाच मी असा

भेटलो अनेकदा नि खूप बोललो
आणि एकदा असेच मूक जाहलो

जाणतेस तेधवाच साच भेटलो
शब्द बोलल्याशिवाय सर्व बोललो

मांडिला प्रपंच तोहि याचसाठि ना ?
लोपुनीच लाभलो किती पुन्हा पुन्हा !

गोड त्यामुळेच आज आपुले जिणे
विस्मरे स्वत:स त्यास विश्व धार्जिणे

पर्वरी आल्त, ३१·७·८३

# का मला तुझीच ओढ

का मला तुझीच ओढ या वयातही
योजने असून दूर साथ प्रत्यही
देह बंधनी असून जीव मोकळा
ऐकतो तुझा सुरेल कोवळा गळा
कष्टताहि गे तुझाच स्पंद जाणवे
त्यातुनी उरी नवाच छंद पालवे
कालभेद स्थानभेद लोपले सखे
तू नि मी परस्परांत लीन सारखे
तू प्रसन्न मी निमग्न आत्मसंगमी
आज आपुली अपूर्व रंगपंचमी

पर्वरी आल्त, १५·१·८४

## तुझे मन

तुझे मन तुझे मन निळे निरभ्र आकाश
तुझे मन तुझे मन सौम्य शुक्राचा प्रकाश

तुझे मन गार गाढ कुळागरातली तळी
उदासीच्या एकान्तात पितो ओंजळी ओंजळी

तुझे मन नेणे माझ्या किती जन्मांचे संचित
कालपर्यंत राहिले कसे गडे अचुंवित ?

तुझे मन मनराणी ! माझ्या आनंदाचे धन
कधी कधी तेच पण येते आसवे घेऊन !

पर्वरी आल्त, ११·२·८४

## कशी आलीस घेऊन

कशी आलीस घेऊन    तेच तेव्हाचे तारुण्य
आणि कारुण्यी न्हालेले    नवे आगळे लावण्य ?

तुझा अजूनही ताजा    तोच पूर्वीचा जिव्हाळा
नव्या प्रत्येक विभ्रमी    जुना उसवतो वाळा

विश्वासाने हातावर    तुझा विसावला हात
फुलारला धन्यतेने    रोमांचांचा पारिजात

किती नियती शहाणी    दोघे वेळीच पांगलो
आणि उराउरी आता    चोख होऊन भेटलो

तुझ्या सुखासवी गडे    माझा ओला झाला खांदा
चार ओठांनी जोडिला    दोन प्राक्तनांचा सांधा

पर्वरी आल्त, १७ २·८४

## नको आणूस आरशी

नको आणूस आरशी
माझा पाणोठाच भला
त्यात सूर्यबिंबापरी
माझा तळपतो टिळा

नको करू वेणीफणी
वाट पाहे माझा धनी
तोच बांधील कुंतल
लांब कोवळ्या बोटांनी

तेथे सोनल सुरंगी
लालचुटुक अबोली
माझ्या माळील वेणीत
फुलहौशी वनमाळी

नको चंदन कस्तुरी
त्याच्या मिठीमाजी दोन्ही
माझ्या राजाच्या ओठांत
गंधगुलाबाचे पाणी

सार बाजूला तो साज
देह फुलाहून ताजा
गडे कालच मी न्हाले
ऋतू फलद्रूप झाला

पर्वरी आल्त, १·३·८४

# डाळिंबीची दोन फुले

डाळिंबीची दोन फुले    एकमेकांना शिवली
तुझ्या माझ्या जिवणींची    भेट मला आठवली

फांदी हालली जराशी    थेंब दवाचे सांडले
खांदी माझ्या तुझे डोळे    होते असे ओसंडले

आली सुगंधी झुळूक    अंग लपेटून गेली
तुझ्या शीतळ स्पर्शाच्या    पुन्हा पालवल्या वेली

खूप सांगायाचे होते    बोल गोठले कंठात
माझ्या श्रद्धेची आंगठी    तुझ्या बैसली बोटात

बोटे बोटांत गुंतली    होती तेथेच थांबली
वाढणाऱ्या उन्हातही    चांदण्याने ओथंबली

पणजी, ७·३·८४

## ‘ बोरकरांची प्रेमकविता ’ / संग्रहशः निवड

या संकलनात ‘ जीवनसंगीत ’ ( १९३८ ) पासून ‘ चिन्मयी ’ ( १९८४ ) पर्यंत बोरकरांच्या नऊही काव्यसंग्रहांतून निवडलेल्या कविता समाविष्ट आहेत. काव्यसंग्रहांच्या नावांपुढील क्रमांक ‘ बोरकरांची प्रेमकविता ’ या संकलनाच्या ‘ अनुक्रमा ’ तील आहेत.

जीवनसंगीत / १ ते १९ ( १९ कविता )

दूधसागर / २० ते २५, २७, ३०, ३१ ( ९ कविता )

आनंदभैरवी / २६, २८, २९, ३२–३९ ( ११ कविता )

चित्रवीणा / ४०, ४१, ४३–५२, ५४–५७, ५९ ( १७ कविता )

गितार / ४२, ६०–६२, ६४–६९, ७१, ७२ ( १२ कविता )

चैत्रपुनव / ७३–७५, ७७–८१ ( ८ कविता )

कांचनसंध्या / ८२–८५, ८७, ८९–१००, १०२ ( १८ कविता )

अनुरागिणी / ५३, ५८, ६३, ७०, ७६, ८६, ८८, १०१ ( ८ कविता )

चिन्मयी / १०३–१११ ( ९ कविता )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## पुस्तकरूपात प्रकाशित झालेली बोरकरांची मराठी काव्यसंपदा

प्रतिभा ( १९३० )

जीवनसंगीत ( १९३८ )

दूधसागर ( १९४७ )

महात्मायन ( १९४८ )

[ ' महात्मायना 'चा प्रारंभीचा भाग ' फक्त खासगी उपयोगार्थ ' १२ पृष्ठांत छापून प्रकाशित झाला होता. ]

आनंदभैरवी ( १९५० )

चित्रवीणा ( १९६० )

गितार ( १९६५ )

चैत्रपुनव ( १९७० )

मेघदूत ( १९८० )

कांचनसंध्या ( १९८१ )

अनुरागिणी ( १९८२ )

चिन्मयी ( १९८४ )

REFBK-0024450
REFBK-0024450

### संकलित / निवडक

बोरकरांची कविता ( १९६० )

चांदणवेल ( १९७२ )

बोरकरांची प्रेमकविता ( १९८४ )